परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १२३ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ सप्टेंबर २०२०
Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना*
***माझा सस्नेह नमस्कार.***

करोनासारख्या महामारीच्या संकटातून आपण हळूहळू बाहेर पडत आहोत. लॉकडाऊन मुळे बाहेर पडणं हिताचं नाही हे आपल्या कुलबांधवांनी ओळखून सर्व नियमांचं यथायोग्य पालन केले आहे. बरेच जण वर्क फ्रॉम होम करीत आहेत. घरबसल्या वेळेचा सदुपयोग करून घेत आहेत.

करोनाच्या पार्श्वभूमीवर श्रीगणरायाचे आगमन झाले आहे. बुद्धीचे आणि कलेचे आराध्य दैवत असणाऱ्या श्रीगणेशाचे स्वागत आपण मोठ्या भक्तीने, श्रद्धाभावाने करीत आहोत.

श्रीगणपती हे महाराष्ट्राचे लाडके दैवत आहे. श्रीगणपती हा १४ विद्या ६४ कलांचा अधिदेवता आहे. कोणत्याही कामाचा प्रारंभ करताना 'श्रीगणेशाने' सुरुवात होते. संत ज्ञानेश्वरांनी 'ॐ नमोजी आद्या। वेद प्रति पाद्या। सकलमती प्रकाशु। श्री गणेशु।' अशी ज्ञानेश्वरीची सुरुवात केली आहे. तर समर्थ रामदास स्वामींनी, 'गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा, मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा' अशी मनाच्या श्लोकांची सुरुवात केली आहे.

सध्या आपण डिजिटली गणेशोत्सव साजरा करत आहोत. ऑनलाईन गणेशदर्शन घेतो आहोत. ऑनलाईन गणेशपूजा, आरती करतो आहोत. घरबसल्या प्रसिद्ध सार्वजनिक गणपतींचे देखावे पाहात आहोत. विज्ञानाची किमया, विज्ञानाची कृपा असल्यामुळे हे सर्व सहजसिद्ध शक्य होत आहे. सार्वजनिक गणपतींच्या मूर्तींही आकाराने लहान असून पर्यावरणपूरक उत्सव आपण साजरा करतो आहोत. आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे आयोजित केली जात आहेत. खरोखर ही फारच चांगली गोष्ट आहे.

करोनाचे काळेकुट्ट संकटाचे ढग जमलेले असले तरी, आकाशात लख्ख वीजेची किनार चमकावी तसे आशेचे किरण ही दिसत आहेत. रामजन्मभूमी पूजनाचा आयोध्या येथील पवित्र सोहळा पाहून धन्यतेचे क्षण आपण अनुभवले. वरूणाची कृपा होऊन पाऊसही उत्तम बरसला. त्यामुळे बळीराजासह सर्व सृष्टी सुखावली.

आता विघ्नहर्त्या श्रीगणेशाकडे, श्रीकुलदेवतेकडे आणि श्रीरामरायाच्या चरणी एकच प्रार्थना करोनाचे संकट नष्ट होऊ दे आणि सर्व कुलबांधवांना सुखरूप ठेव. शुभं भवतु।

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. २३ ऑगस्ट २०२०, ऋषिपंचमी)
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

**आपण सद्यस्थितीचा विचार करून 'हितगुज' जुन २०२०च्या अंकापासून आपला अंक 'ई' स्वरुपात प्रकाशित करत आहोत व आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देत आहोत. आपण आपल्या प्रतिक्रिया अवश्य द्याव्यात.**

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# विश्व मराठी परिषदेच्या प्रतिनिधीपदी निवड!!!

**वि**श्व मराठी परिषदेचे सदस्य संपूर्ण जगभर विखुरलेले आहेत. काही लाख सदस्य संख्या असणारी ही संस्था आपले उपक्रम जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोचविण्यासाठी पात्र प्रतिनिधींची निवड करीत असते. नुकतीच माझी या कामी निवड करण्यात आली आहे. वि.म.परिषदेचे प्रमुख संयोजक प्रा. अनिकेत पाटील यांनी आजच मला माझी निवड झाल्याचा संदेश पाठविला आहे

जानेवारी २०२१ मध्ये होऊ घातलेल्या ऑनलाइन संमेलनासह परिषदेचे कार्य लोकांपर्यंत पोचविणे आणि भविष्यातील उपक्रमांतर्गत आपल्या कार्यक्षेत्रात सृजनात्मक कार्य करणे अपेक्षित असल्याने मायबोली मराठीची आणखी थोडी सेवा करण्याची संधी चालून आली आहे. आपण सर्वांच्या सहकार्य, आशीर्वाद आणि पाठिंब्यावर मी यातही काहीतरी चांगले काम करू शकेन असा विश्वास आहेच. धन्यवाद !!!

लवकरच मला परिषदेचे आजीवन सभासदत्वही मिळेल.

मायबोली मराठीचा विजय असो !!!

– **AK मराठे** (९४०५७५१६९८), *कुर्धे, पावस, रत्नागिरी*

---

## अमरावती येथील कुलबांधव श्री संजय मराठे यांचा झालेल्या सत्काराची क्षणचित्रे.



फोटोत सत्कार करताना अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, अमरावतीचे पदाधिकारी आणि लाल शर्ट परिधान केलेले, अमरावती चित्तपावन संघाचे अध्यक्ष श्रीरंग फाटक.



फोटोत शेजारी माझ्या मोठ्या वहिनी, श्रीमती रेखा मराठे (वय वर्षे ८१ पुर्ण). याही सेवानिवृत्त मुख्याध्यापिका. शेजारी बसलेला, विनोद मराठे, उपाध्यक्ष अमरावती चित्तपावन संघ, अमरावती. हाही 'मराठे प्रतिष्ठान'चा लाईफ मेंबर आहे. आपल्या ग्रुपवरील डॉ. प्रमोद मराठेचा भाऊ. 'दै. हिंदुस्थान'चा क्रियाशील भागीदार.




सत्कार, शैक्षणिक, आणि जलतरण क्षेत्रातील विशेष कार्याबद्दल.

---

## कल्याण येथील कुलबांधव श्री सुधीर मराठे यांनी त्यांच्या काकांसंबधी पाठवलेली छायाचित्रे व त्रोटक माहीती.



या काकांना केरळमध्ये संगीतकार म्हणून टॉफी मिळाल्या



माझे सख्खे काका शरदचंद्र रघुनाथ मराठे हे केरळमध्ये ६० वर्ष राहात होते केरळमध्ये मळलयालम संगीतकार म्हणून त्यांना अनेक पुरस्कार मिळाले काकांची छोटीशी clip पाठवत आहे भाषा मळयालम आहे

# संवाद कुलबांधवांशी

•श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

नमस्कार मंडळी,

आपण मार्च महिन्यापासून कोरोनाच्या महामारीच्या संकटामुळे घरीच थांबलो आहोत. अत्यावश्यक सेवेतील लोक मात्र अहोरात्र कामात गुंतलेले आहेत. आता इतर क्षेत्रातील लोकही हळूहळू कामाला लागले असून प्रत्येक जण स्वतः बरोबर इतरांचीही काळजी घेत आपापली कामे करत आहेत.

छपाई बंद असल्याने आपणही आपला लाडक्या ‘हितगुज’चा जून २०२० चा अंक तंत्रज्ञान वापरून वेळेवर आपल्याला सुपूर्द केला. ‘मराठे प्रतिष्ठान’च्या वेबसाइटवर ‘हितगुज’चा अंक अगदी वेळेवर प्रकाशित करण्यात आला. सुरुवातीला बरेच जणांना अंक शोधणं जमत नव्हतं परंतु योग्य मार्गदर्शन मिळाल्यानंतर लहान थोर सर्वांनी अंक सहज वाचला.

असा ‘ई’ अंक काढल्याने महत्त्वाचा फायदा हा झाला की अंक पोस्टाने मिळाला नाही अशी तक्रार कोणीही करू शकत नाही, जेव्हा पाहीजे तेव्हा आपल्या वेबसाइटवर जाऊन किंवा डाउनलोड करून ठेवलेला अंक कसाही कुठेही वाचू शकतो. लॉकडाउनचा हा एक फायदाच म्हणायचा. सकारात्मक विचार. याचा प्रसार होण्यासाठी आपणा प्रत्येकाला एक गोष्ट करायची आहे ती म्हणजे आपण अंक वाचला की आपल्या ओळखीच्या प्रत्येक मराठे कुलबांधव, भगिनींना याची माहिती द्यायची व अंक वाचायला प्रवृत्त करायचे, हळूहळू सर्वांपर्यंत ही माहिती पोहोचली की जसे अगोदर दर तीन महिन्यांनी पोस्टमनची वाट बघितली जायची तसे आता वेबसाइटकडे लक्ष ठेवायचे.

मंडळी गेले चार पाच महिने हे प्रत्येक घरात विविध प्रकारे व्यतित झाले असतील, ज्यांना अत्यावश्यक सेवेला जावे लागते ते व त्यांच्या घरातील सदस्य कायम चिंतेत तर ज्यांना कामाला जाता येत नाही त्यांना पगाराची चिंता, व्यावसायिकांना तर खूपच आर्थिक चिंता, कारण आवक नाही पण देणी आहेतच, निवृत्तांना कोठे जाणे मुश्किल, तसेच डॉक्टरी उपचार होणे मुश्किल, असे एकंदरीत सर्वचजण चिंताग्रस्त परिस्थितीत दिवस घालवत आहेत. मात्र, आपल्या लोकांची खास गोष्ट म्हणजे या अशा परिस्थितीत देखील आपल्या समस्या, दुःख दुसऱ्यांना कळू देत नाहीत व आलेल्या संकटांना आत्मविश्वासाने तोंड देत आहेत. खरच कौतुक करावे तेवढे थोडेच आहे आपल्या समाजाचे.

अशाच एका कुटुंबाने कोरोना या आजारावर कशी मात केली यावरील लेख या अंकामधे आम्ही देत आहोत.

जून २०२० सुरुवातीलाच कोकणात झालेल्या चक्रीवादळामुळे अलिबाग येथील आपले कुलबांधव शैलेश मराठे व अनिल मराठे या व इतर बऱ्याच कुटुंबांचे घरादारासह वाडीचे अपरिमित नुकसान झाले. नैसर्गिक आपत्ती पुढे मनुष्याचे काही चालत नाही.

यंदा सगळे सण घरातल्या घरात साजरे करावे लागत आहेत, पण आपण माघारही घ्यायची नाही, तोच उत्साह कायम ठेवत घरातील लोकांसह सगळे सण साजरे करत आहोत, आता येणारा गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी हेही सण अशाच उत्साहात साजरे करून या कोरोना नामक आजारावर मात करूया.

प्रतिवर्षी प्रमाणे घरगुती गणेशोत्सव स्पर्धा होणार आहे व त्यासाठी आपले सजावट केलेले फोटो अवश्य पाठवावेत.

यंदा आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेवर देखील कोरोनाचे सावट असल्याने सभा बहुधा ऑनलाईन घ्यावी लागणार असे वाटते आहे.

असो, आपल्या प्रत्येक गोष्टीवर या कोरोनाचे सावट पडले आहे, मात्र आपण न घाबरता याचा सामना करून यावर मात करायची आहे.

आपणा सर्वांना येणाऱ्या गणेशोत्सव, नवरात्र तसेच दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा. आपणा सर्वांना या संकटातून पार पडण्याची शक्ती मिळो ही प्रभुचरणी प्रार्थना. ♦

## वाचकांचा पत्रव्यवहार

प्रिय श्री. हेमंतजी,

सादर नमस्कार.

जून, २०२० चा हितगुज चा अंक छान झालाय. मी एक उपयोगी स्तंभ सुचवू इच्छितो. मराठे परिवारातील (आणि अधूनमधून अन्य) उद्योजकांच्या यशस्वी गाथा संक्षिप्त रुपाने प्रकाशित कराव्यात. त्यात उद्योजकाने अडचणींवर मात कशी केली व कल्पकता कोणती वापरली, यावर भर असावा. मुलाखतीच्या स्वरूपातही हा विषय मांडता येईल. विशेषतः स्टार्टअप उद्योग व त्यातील यशापयश अधिक मार्गदर्शक व वाचनीय ठरेल. पुढील सर्व उपक्रमांसाठी हार्दिक शुभेच्छा!

आपला स्नेहांकित,

डॉ. गिरीश जाखोटिया मराठे.

# अ परफेक्ट मॅच

• राधा श्रीकांत मराठे, पुणे भ्रमणध्वनी : ९८५०४ ३३६३१

**न**ऊ वाजून वीस मिनिटं झाली होती. प्रत्येकाचं लक्ष दाराकडे होतं. रेवती आज लग्नानंतर कामावर रुजू व्हायची होती. सगळेजण तिची उत्सुकतेने वाट बघत होते. आणि ती ऑफिसमध्ये शिरली. फिक्या गुलाबी रंगाची कांजीवरम, गळ्यात कोरं, ठसठशीत मंगळसूत्र, कपाळावर कुंकू आणि केसांचा दिमाखदार पोनीटेल. नेहमीप्रमाणे हसतमुख, आकर्षक पण अगदी वेगळी दिसत होती. सगळे तिच्या भोवती जमले. चेष्टा, कौतुक, सूचक प्रश्न हे सगळं झेलत, परतवत ती स्वत:शी हसत होती. पावणे दहाच्या सुमाराला ऑफिस रोजच्या कामाला लागलं. दुसऱ्या दिवशी परत साडी. नंतर सिल्कचे, खादीचे सुरेख ड्रेसेस, सुती-रेशमी साड्या. मंगळसूत्र छोटं झालं. पण कुंकू आणि पोनीटेल राहिलंच. ८-१० दिवस झाले आणि एक दिवस वीणा म्हणाली, लंचला चल ना. रेवती निघता निघता थांबली. अगं, समीरच्या आईने दिलाय लंच बॉक्स. उद्या मी नाही आणत, उद्या जाऊ नक्की. वीणा चकित. रेवती इतका विचार कधी करायला लागली? कायम जीन्स-टी शर्ट, जीन्स-कुर्ता घालणारी, केस मोकळे सोडून फिरणारी, टिपिकल गोष्टींना फाटा देऊन आपल्याला हवं तस्संच राहणारी, कधीही-कुठेही जाणारी, काहीही करणारी मनमौजी रेवती - इतका बदल? अगदी खाली डोकं वर पाय इतका? कुछ तो गडबड है दया. ...पता करो।'

दुसऱ्या दिवशी लंचला गेल्यावर वीणाने थेट प्रश्न केला, रेवती, इतका बदल तुझ्यात? का आणि कशासाठी? रेवती हसली. वाटलंच होतं तू असं विचारणार... मग रेवतीने सगळंच सांगितलं.

तिचे आणि समीरचे वडील एकत्र काम करत होते. गेल्या वर्षी समीरचे वडील रिटायर झाले तेव्हा त्यांना जेवायला बोलावलं होतं घरी आणि रेवतीला सून करून घेण्याबद्दल विचारलं. समीरच्या आई-बाबांना बहुतेक हे अपेक्षित होतं. त्यांनी समीरशी बोलायला सांगितलं. ते गेल्यावर रेवतीच्या चेहऱ्यावरची नाराजी, प्रश्नचिन्ह पाहून बाबा म्हणाले, मी तुला विचारल्यावर तू नाही म्हणाली असतीस तर मला मुद्दाम विषय काढता आला नसता. तू एकदा त्याला भेट. नाही म्हणण्याचा तुझा हक्क मी नाकारतच नाही. पण न भेटता नाही म्हणू नयेस म्हणून मी थोडी लबाडी केली. रेवती समीरला भेटली आणि तिला तो आवडलाच. शिक्षण, पोस्ट, संस्कार हे सगळं तिच्या बाबांनी आधीच पारखलं होतं. पण त्याच्या वागण्यातली ऋजुता, अदब - तिला एकदम पटलंच. आम्ही नियमित भेटत होतो, पण तरी निर्णय घेता येत नव्हता मला. मग एकदा त्यानेच विषय काढला. मी सरळ सांगितलं त्याला की 'मला घरकाम येत नाही, करायला आवडत नाही. मी माझं काम सोडणार नाही. उलट तिथे आणखी काही वेगळं करण्याचं माझं स्वप्न आहे. आर्थिक स्वातंत्र्य माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे.' त्याने ते सगळं मान्य केलं. 'मी किंवा माझे आई बाबा तुला या कशाचीही सक्ती करणार नाही' असं अगदी पक्कं सांगितलं. पण दोन दिवसांनी त्याने त्याच्या अटी सांगितल्या. आता वीणा सरसावून बसली.

समीरने सांगितलं की त्यांचं घर चांगलं प्रशस्त आहे. तिला अपेक्षित असलेली प्रायव्हसी तिला तिथे मिळेल. तो वेगळं घर करणार नाही. त्या दोघांच्यात त्याचे आईबाबा कधीही ढवळाढवळ करणार नाहीत. पण त्यांच्या काही छोट्या अपेक्षा आहेत. तिने अगदी टिपिकल नाही पण त्यांच्या अपेक्षेत बसणारी सून असावं. पोशाख आणि एकंदर राहणी त्यांच्या घराशी, राहणीशी सुसंगत असावी. घरातल्या खासगी गोष्टी बाहेर कळणार नाहीत, पण बाहेर दिसायला ती वेगळी दिसायला नको. किंवा घरात वावरतांना सुद्धा ती कोणी वेगळी आहे असं वाटायला नको. रेवती चांगलीच हादरली. साडी-मंगळसूत्र-कुंकू असं राहायचं? म्हणजे हे टिपिकलच झालं की. ती काही बोलली नाही पण 'हे आपल्याला जमणार नाही.' हे तिने मनाशी ठरवून टाकलं. ८-१० दिवस ती त्याला भेटली नाही. त्याला फोन केला नाही. तो फोन करेल याची वाट बघत राहिली. पण त्यानेही फोन केला नाही. मग तिनेच फोन केला. माझ्याशी बोलणार नाहीयेस का?

मी तुला काही प्रश्न विचारले आहेत, रेवती आणि त्याच्या उत्तराची वाट पाहतो आहे. मला तुझ्यावर कोणताही दबाव आणायचा नाहीये. तू शांतपणे विचार कर. पुरेसा वेळ घे. तुझा निर्णय काहीही असला तरी तो तू आपणहून घ्यावास म्हणून मी दूर राहिलो आहे.

तिची अस्वस्थता आईला कळली. तिने खोदून खोदून विचारलं. समीरच्या अटी ऐकून तीही विचारात पडली. रेवतीला हे असलं काही जमणार नाही याची तिला खात्री होती. पण रेवतीची तगमग वाढत चालली तेव्हा तिने बाबांना सांगितलं.

२-४ दिवसांनी बाबा म्हणाले, रेवती, आयुष्य तुझं आहे, निर्णय तूच घ्यायचा आहेस. पण मी तुला काही गोष्टी सांगतो, त्याही विचारात घे. तुझ्यासाठी महत्त्वाचं काय? तुझं काम, स्वातंत्र्य की पोशाख, राहणी? आधी गोड गोड बोलून नंतर रंग बदलणारी माणसं आपण पाहतो. समीरने आधीच सगळं स्पष्ट सांगितलंय त्यामुळे तुला विचार करण्याची पुरेपूर संधी मिळतेय हे लक्षात घे.

पण बाबा, आत्ता तो हे सांगतोय, पुढे इतर टिपिकल गोष्टींचा आग्रह धरला तर?

रेवा, आत्ता त्याने तुझ्या काम आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या अटी मान्य केल्या आहेत. त्या बाबतीतही तो असं वागू शकतो, ही भीती नाही वाटत तुला? तू तुझ्या सोयीने विश्वास ठेवते आहेस आणि तुझ्या सोयीने भीती बाळगते आहेस. तो सच्चा असेल तर असं नाही करणार. आणि लबाड असेल तर नंतर तुझ्यावर कोणतीही बंधनं घालण्याचा प्रयत्न करू शकतो. पण ही रिस्क कोणत्याही मुलाबद्दल असणार नाही का? आज तू समीरला नाही म्हणू शकतेस, पण उद्या जो मुलगा सांगून येईल तो असा वागणारच नाही याची खात्री कोण आणि कशी देणार? म्हणजे कुठेतरी, कोणावर तरी विश्वास ठेवावा लागेलच तुला. मग याच्यावर का नाही? आणि रेवती, तुला शिकलेला, हुद्देदार, प्रतिष्ठित असणारा आणि तरीही स्वत:ची कोणतीही अट न ठेवता तुझ्या सगळ्या अटी बिनशर्त मान्य करणारा नवरा हवाय - तसा मिळेल याची खात्री आहे तुला? तू तरी अशी वागशील? या प्रश्नाचं उत्तर हो असेल तर तू दे नकार. मी तुझ्यावर जबरदस्ती करणार नाही हे तुला आधीच सांगितलं आहे.

पण या काय पोरकट अटी घालतोय तो... रेवती कुरकुरली. धरलं तर चावतंय अशा अवस्थेत सापडली होती ती. रेवा, त्याच्या अपेक्षांना पोरकट म्हणायचा अधिकार तुला नाही. तुझ्या अपेक्षांना तो असंच एखादं नाव देऊ शकतो. ते नाही केलंय त्याने. तू नाही म्हण. विषय संपवून टाक. पण एकीकडे माणसाच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचं महत्त्व तुला कळतंय आणि एकीकडे तू म्हणशील तस्संच त्याने वागलं पाहिजे, तुझं प्रत्येक म्हणणं मान्य केलं पाहिजे अशी अपेक्षा तू करावीस याचं मला आश्चर्य वाटतंय.

खूप चरफडली रेवती. पण तिला कळून चुकलं की नाही म्हणणं आपल्याला जमणार नाहीये. मग ती त्याला भेटली आणि स्वत:मध्ये आवश्यक ते बदल घडवून आणायला वेळ मागितला. गेले ५-६ महिने ती घरी सलवार-कमीज घालतेय, त्याच्याबरोबर जातांना पण साडी. सलवार-कमीज असाच पोशाख. २-३ वेळा दोघं दिवसभर लांब फिरुन आले. खूप बोलले. बऱ्याच गोष्टींची चर्चा केली, बेत ठरवले. आणि २-३ महिन्यापूर्वी तो अचानक म्हणाला, आता थांबायचं कशाला? लगेच लग्न करू. दोघांच्याही घरी हळूहळू तयारी चालूच होती. आणि मग पुढच्या गोष्टी फटाफट झाल्या.

आता दीड महिना होईल आमच्या लग्नाला. समीरच्या आईने मला कधीही, काहीही काम सांगितलेलं नाही. आमच्याकडे ३ बायका आहेत कामाला. त्या सगळ्यांना कामाची अशी शिस्त लावली आहे त्यांनी की न बोलता सगळ्या गोष्टी होत असतात. माझ्या खाण्याच्या सवयी त्यांनी स्वयंपाकाच्या बाईना सांगितल्या आहेत. त्या बरोबर करतात सगळं. माझा डबा अगदी वेळेवर तयार असतो टेबलावर. सुट्टीच्या दिवशी सकाळी साडेसात वाजता उठावं लागतं आणि दिवसभर लोळत पडता येत नाही, एवढं सोडलं तर बाकी मी मजेत आहे. काही फरक नाही पडलाय माझ्या आयुष्यात.

हे झालं सासुबाईंबद्दल, आणि समीर? त्याचं काय?

त्याचं काय आता?

वीणाच्या चेहऱ्यावरचं मिष्कील प्रश्नचिन्ह पाहून रेवती लाजली. वीणा उडलीच. ही चक्क लाजतेय? म्हणजे जादुगारच दिसतोय हा समीर.

खरंच ग वीणा, आमचे एकत्रित आर्थिक व्यवहार समीरने इतके चट्कन मार्गी लावलेत ना, की मला काही म्हणता काही बघावं लागलं नाही. मला तो आधीच आवडला होता, म्हणून तर हे सगळं मी कबूल केलं ना? पण आता तो जास्तच गोड वागतोय गं. म्हणजे आधी तो असा जरा अंतरावर होता, पण आता आमच्यातलं अंतर अगदी मिटलंय, म्हणजे त्यानेच मिटवलंय. सांगू का, 'ते सिनेमात किंवा नॉव्हेलमध्ये नाही का म्हणत जन्मो-जन्मीचं नातं वगैरे तसा फील येतो मला त्याच्या बरोबर असतांना. बघता-बघता तिचा चेहरा लाल-गुलाबी झाला आणि वीणाला कळून चुकलं ये तो गयी कामसे।'

फरक पडला नाही असं म्हणतेयस तू रेवा, पण तसं नाहीये बरं का. खूप बदलली आहेस तू; पण जो फरक झालाय तो तुला मनोमन आवडलाय. हो ना?

वीणा, बाबा म्हणाले ते खरंच होतं. कुठेतरी, कुणावर तरी विश्वास टाकायला हवाच. मी तो योग्य माणसावर टाकलाय. समीरसारखा नवरा मला मिळालाच नसता जर मी माझ्या अटींवर

अडून बसले असते तर. आणि नुकसान माझंच झालं असतं. आयुष्यात तडजोड हवीच असं आपण तोंडाने म्हणतो, पण ती करायची वेळ येते तेव्हा गोंधळतो. तडजोडीला त्याग समजतो आणि उगाचच स्वत:चा अहंकार पोसत राहतो. बाबांमुळे मी जरा वेगळा विचार करुन बघायला राजी झाले. आपले पेरेंट्स आपल्या चांगल्याचाच विचार करतात गं, आपल्याला ते कळायला वेळ लागतो.

वरवरच्या गोष्टींना अतिरेकी महत्त्व न देता तिने शहाणपणाचा निर्णय घेतला आणि त्याचा पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही याची तिला खात्री वाटत होती. रेवतीचा चेहरा आनंदाने, तृप्तीने चमकत होता.

♦

# कविता

हसत हसत, होतो वाचत,
‘वाऱ्यावरची वरात,
आले की हो, समोर माझ्या,
आपले ‘भाई’ साक्षात!!

बावरलो मी, सावरलो मी,
क्षणात झालो नतमस्तक,
हसत, हसत, म्हणाले ते ही,
मी तर साधा लेखणी सेवक!!

हळूच पाहता, त्यांनी वळून
सोनेरी त्या, ‘चस्म्या’ नजरेतून,
पुस्तक त्यांचेच, माझ्या हातात,
हसले असावेत, ते ही क्षणात!!

पूटपुटलो मी हळूच मनात,
तुम्हीच आमचे दैवत साक्षात,
साऱ्या सारस्वतांचां साहित्य मेवा,
पिढ्यान् पिढ्यांचा तो तर ठेवा!!

बालपणीचे ‘नाच रे मोरा’
‘गणगोतां’ सह हसता चेहरा,
‘नारायण’ ही झालो कधीतरी,
‘पर्यटन’ ही केलें घरच्या घरी!!

संवादिनी सह संवाद रोजचा,
कधी मधी ‘गणपती, गुळाचा’,
ही तर सारी तुमचीच किमया,
असो ध्यावी सदैव छाया!!

हसले भाई, गोड गालातून,
वदले माझ्या काना कानातून,
जपून ठेव हा सारा खजिना,
मायबोलीचा आपल्या दागिना!!

क्षणात सारे गेले विरुन,
हसलो मी ही मनातून,
जपतो आहे स्वप्न सारे ते
अंतरीच्या कणा कणातून!!

धरू आस सारे मिळूनी,
करू सेवा मराठीची,
वाढवू खजिना मायबोलीचा
आनंद साऱ्या आयुष्य भराचा!!!

**– सुधाकर (बाळ) मराठे**
(९८२२३ २९७७०)

# भरारी

कागदाची होडी, त्याला
निरागसतेचि जोडी
रमत-गमत थोडी, आपला
किनारा सोडी
वाऱ्याच्या कोडी, आपलं
सोडवुनी होडी
प्रवासाची गोडी, त्याला
लाटां मोडी
वाटेतली काडी, त्याचा
प्रवाह तोडी
दिशाहीन होडी, मग
अडखळे थोडी
कागदाची होडी, आता
भिजली थोडी
आशेचि होडी, आता
जागेवरच पडी
मूसू मूसू रडी, आता
मुलिंची जोडी
कागदाची होडी, ती
टिकतेच थोडी!
मुलिंची जोडी, पुन्हा
घेऊ आता उडी
मग काय परत तेच!!!
कागदाची होडी, त्याला
निरागसतेचि जोडी........

**– सुयश विश्वास मराठे**

# आम्ही एक राष्ट्र आहोत काय?

• डॉ. गिरीश जाखोटिया भ्रमणध्वनी : ९८२०० ६२११६

**न**मस्कार मित्रांनो! आज एका अत्यंत महत्त्वाच्या, संवेदनशील व सध्या चर्चिल्या जाणाऱ्या विषयाकडे संक्षिप्तपणे पाहूयात. राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रीयता व राष्ट्रप्रेम या संकल्पनांभोवती जगभरात खंडनमंडन चालू आहे. राष्ट्र (Nation) कुणाला म्हणावं? किंवा 'राष्ट्र' असण्याची वैशिष्ट्ये काय असावीत? राष्ट्र (Nation) व देश (Country) यामध्ये फरक काय? आधी आपण या दोन संज्ञांचा प्रचलित अर्थ पाहूयात. राष्ट्र म्हणजे साधारणपणे एक संस्कृती, विचारधारा, भाषा व पारंपारिक वा ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेला लोकांचा एकसंध समूह. देश किंवा Countryमध्ये विविध भाषिक व विविध संस्कृतीचे लोक एकत्र येऊन एका विशिष्ट भूभागावर 'सरकार' नावाच्या यंत्रणेद्वारे आपलं सार्वभौम अस्तित्व रचतात. बरीच वर्षे भूभाग नसल्याने ज्यू लोक आपल्या 'राष्ट्रा'ची संकल्पना हृदयाशी कवटाळून होते व मानसिकदृष्ट्या हे राष्ट्र सांभाळत होते. भूभाग मिळाल्यानंतर या एकसंध समाजाचा सरकारप्रणित देश तयार झाला. प्रचलित अर्थाने इस्राएल हा राष्ट्र (एकसंध समाज व संस्कृती) आणि देश (भूभाग, सरकार व सार्वभौमता), असा दोन्ही आहे.

वरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर सुरुवातीला अमेरिका हा विविध संस्कृती व भाषा बोलणाऱ्या युरोपियन लोकांचा कायदेशीर, सरकारप्रणित देश होता. आफ्रिकन व आशियाई लोक आपापली संस्कृती घेऊन यांना सामील झाले. साधारणपणे पन्नास वर्षांत या विविध सांस्कृतिक समूहांनी एकजीव अशी 'अमेरिकी संस्कृती', अमेरिकन उच्चारांची इंग्रजी व अमेरिकी अभिमान इत्यादी गोष्टी साकार केल्या. यामुळे आज तो एक 'राष्ट्र' म्हणून गणला जाऊ शकतो. या राष्ट्राने प्रचंड आर्थिक, सामाजिक, सामरिक, वैज्ञानिक व राजकीय प्रगती केली. (गेल्या दोन दशकांत मात्र या प्रगतीत मोठा खंड पडलाय.) याविरुद्ध धर्मावर आधारित बहुतेक मुस्लीम 'राष्ट्र' हे आजही मागासलेले आहेत. तेलाने दिलेल्या पैशातून त्यांनी पश्चिमी देशांच्या मदतीने सुखसोयी उभ्या केल्या ज्या तेलाचे साठे संपल्यावर टिकतील की नाही, माहीत नाही. युरोपातील बहुतेक देशांचा धर्म हा ख्रिश्चन असूनही त्यांच्या आंतरिक संस्कृती व भाषा भिन्न असल्याने त्यांचा एकच एकसंध राष्ट्र वा देश होऊ शकला नाही. 'युरोपियन युनियन' ही फक्त एक आर्थिक व उद्योजकीय व्यवस्था आहे.

सौदी अरेबियात एकसंध समाज, संस्कृती व भाषा आहे पण तरीही ते 'राष्ट्र' म्हणून प्रगत, प्रगल्भ व समाधानी नाही. हीच बाब चीनची. हान संस्कृती, मंडरिन भाषा व चिनी अभिमान असूनही चीन हा 'राष्ट्र' म्हणून किती काळ तग धरू शकेल, याची शाश्वती नाही. सौदी अरेबियात शेख परिवार व जनता यांच्यामध्ये प्रचंड तफावत आहे. तेलाच्या पैशावर जनता पोसली गेलीय. 'राष्ट्र' ही भावना त्यागातही टिकून रहायला हवी. तेल संपले की या देशाची शकले होऊ शकतील. फक्त 'इस्लाम' त्यांना एकत्र ठेवू शकणार नाही. चीनमध्येही आर्थिक सुबत्ता ढासळू लागली की कम्युनिस्ट पार्टीची पोलादी पकड ढिली होत जाईल. सैन्याच्या बळावर चीन आपला भौगोलिक एकसंधपणा काही काळ टिकवेलही परंतु तो 'राष्ट्र' या अर्थाने दीर्घकाळ टिकणार नाही. यासाठीच चिनी सरकार सध्या 'भव्य चिनी स्वप्ना'च्या माध्यमातून राष्ट्र बनण्याचा कृत्रिम प्रयोग करतोय. इस्लाम हा समान धर्म असूनही पाकिस्तान व बांगलादेश वेगळे झाले कारण यांच्या संस्कृती खूप भिन्न आहेत. (संस्कृती म्हणजे चालीरीती, सण, निसर्गाशी असलेले सख्य, भाषा, पेहराव, गायन - वादन इ.इ.) इथे संस्कृती धर्माला वरचढ ठरली आणि ती बहुतेक वेळा वरचढच ठरत आलीय. आज स्वतःची बलस्थाने ओळखत बांगलादेश वेगाने आर्थिक प्रगती करतोय तर धर्माला कवटाळून बसलेला व मुल्ला - मौलवींनी धाकात ठेवलेला पाकिस्तान वेगाने कोलमडतोय. दुसऱ्या महायुद्धानंतर होरपळलेल्या जर्मन लोकांनी वंशवाद टाकून दिला नि त्यांचं राष्ट्र आज युरोपाचं नेतृत्व करतंय.

या सर्व चर्चेनंतर आपण प्रश्न आपल्यालाच विचारूयात की आपण प्रचलित व्याख्येनुसार आज एक राष्ट्र आहोत की देश की दोन्ही? पहिले वास्तव असे की आमच्याकडे प्रचलित व्याख्येनुसार विविध संस्कृती आनंदाने नांदताहेत. म्हणूनच आम्ही म्हणत आलोय - विविधतामें एकता! इथे विविध धर्मही नांदताहेत. एक केंद्रीय सरकार, सार्वभौमकता व स्वतःचा भूभाग असल्याने व्याख्येनुसार आम्ही एक 'देश' (Country) आहोतच. आम्ही एक राष्ट्र आहोत का? -

या प्रश्नाचे उत्तर पहाण्याआधी आणखी एक वास्तव जाणून घेऊयात. आमच्या येथील प्रजेचे तीन ढोबळ प्रकार होतात – सामाजिकदृष्ट्या वरचढ म्हणून आर्थिकदृष्ट्या पुढारलेले, चातुर्वर्ण्यव्यवस्थेला वापरून कृत्रिमरित्या सामाजिकदृष्ट्या मागास केलेले व म्हणून आर्थिकदृष्ट्याही मागास राहिलेले आणि आपली आदीम संस्कृती जपणारे आदिवासी. हे तीनही समूह प्राचीन सिंधूसंस्कृती, तिचा उपगट म्हणावं अशी द्रवीड संस्कृती, स्त्रीगौरवाच्या परंपरा, बाहेरून आलेल्या संस्कृती, पुरूषप्रधानतेचा नंतर झालेला बोलबाला इत्यादी अनेक गोष्टींनी विविध प्रकारे प्रभावित झालेले आहेत. याची भौगोलिक व्याप्ती 'भारतीय उपखंड' म्हणून नंतर ओळखली जाऊ लागली. सहा – सातशे वर्षांपूर्वी सिंधूपलिकडे रहाणाऱ्या वा असणाऱ्या या उपखंडाला हिंदुस्थान हे नाव व येथील प्रजेला हिंदू हे नाव बाहेरच्यांकडून ढोबळमानाने चिकटवलं गेलं (Sindhu - Indus - India). कोणत्याही भारतीय प्राचीन इतिहासात, साहित्यात 'हिंदू' हा उल्लेख नाही.

मी भारताबाहेर गेलो की मस्कत मधील ख्रिश्चन केरळी माणसाला भेटताच मला आनंद होतो. आमचे धर्म वेगळे, भाषा व पेहराव वेगळे, खानपान भिन्न पण तरीही भारतीय म्हणून आम्हा दोघांचा ऊर भरून येतो. (भारताबाहेर हे ऊर भरून येणं जरा जास्तच होतं, जे नैसर्गिक म्हणावं लागेल!) हे जे भारतीयत्व आहे ते खास आहे! हे भारतीयत्व आम्हाला राष्ट्र असण्याची ग्वाही देतं. हे भारतीयत्वच 'राष्ट्रा'ची प्रचलित व्याख्या तोकडी बनवतं. यास्तव मला राष्ट्र ही संकल्पना अधिक व्यापक कराविशी वाटते. राष्ट्राचा प्रचलित अर्थ (आपण वर पाहिला) म्हणजे एक संस्कृती, एक भाषा, एक इतिहास इत्यादींनी एकसंध झालेला लोकसमूह. वर उल्लेखिल्याप्रमाणे या सर्वच बाबतीत आमच्याकडे विविधता आहे आणि तरीही आम्ही अमूर्त, आत्मिक व आनंददायी अशा भारतीय एकजिनसीपणावर श्रद्धा ठेवून एक राष्ट्र म्हणून मार्गक्रमणा करीत आलोत. अशा असाधारण मानसिक एकजिनसीपणामुळे चेन्नई, मुंबई, जयपूर, लखनौ, गौहाटी, हैदराबाद, जम्मू, चंदिगढ, धारवाड, कोच्ची, भोपाळ,पटणा आणि भुवनेश्वरमधील विविधपंथी लोक मला माझे बांधव वाटतात.

आमचं राष्ट्रीय असणं हे एखाद्या सुंदर ऑर्केस्ट्रा सारखं आहे. म्हणजे विविध वाद्ये, ती वाजवणारे विविध कौशल्य असलेले कलाकार हे परस्पर सामंजस्याने एकच सुंदर सूर काढण्याची मानसिकता वापरत एखादं गाणं अवीट गोडीने ऐकवतात. यातली मानसिक एकसंधता ही कौशल्यापेक्षा व वाद्यांपेक्षा अधिक महत्त्वाची. तद्वतच भारत – एक महान राष्ट्र म्हणून साकारण्याचं सामुदायिक स्वप्न (Vision) व त्यासाठी पार पाडावयाची कर्तव्ये (Mission) ही जर सर्वसंमत, सर्वस्पर्शी व सर्वहितकारी असतील तर मानसिक एकजिनसीपणा वाढेल व भारत हा सर्वार्थाने महान राष्ट्र होईल. यासाठी सांस्कृतिक विविधता जपताना आर्थिक समृद्धी, बौद्धिक प्रगती व सामाजिक दायित्त्व या तीन प्रमुख गोष्टींवर सर्व भारतियांसाठी आम्हाला काम करावे लागेल. या महान राष्ट्र घडण्याच्या एकूणच ध्येयाचा तपशील आम्हाला सर्वसंमतीने ठरवावा लागेल. हे एकाच पक्षाचे वा संघटनेचे अथवा विचारधारेचे दायित्व असून चालणार नाही. विविधतेतील एकता टिकण्यात व वाढण्यात म्हणजेच मानसिक एकजिनसीपणात आमच्या 'संपूर्ण' राष्ट्रीयत्वाचे सार दडलेले आहे. आणि हे सार भारतीयत्वात आहे!

आपण आपल्या विस्तृत प्रतिक्रिया माझ्या पुढील ईमेल पत्त्यावर पाठवू शकता – girishjakhotiya@gmail.com ♦

## सुविचार

ज्ञानेश्वर माऊली नंतर समाधी नाही...
तुकोबा नंतर वैकुंठ गमन नाही...
शिवराया नंतर छत्रपती नाही...
बालगंधर्वा नंतर गाणं नाही...
रामा नंतर आचरण नाही...
रावणा नंतर श्रीमंती नाही...
गरूडा नंतर भरारी नाही...
मेघा नंतर उदारता नाही...
कर्णा नंतर औदार्य नाही...
साधू नंतर कृपा नाही...
आई नंतर प्रेम नाही...
मृत्यू नंतर भय नाही...
नरदेहा नंतर पुन्हा देह नाही...
आणि जिवन जगताना हे कधीच
विसरायचे नाही...
म्हणूनच मनापासून खुप प्रेम करा...
मनुष्य जन्म पुन्हा नाही...

# एका महिन्याचा स्मृतिदिन

• शरद कृष्णाजी मराठे
भ्रमणध्वनी : ९८६९०२७३९९

दिनांक ८/१/१९७५ रोजी आपला विवाह होऊन तू माहेरहून म्हणजे रत्नागिरीहून सासरी, गोरेगाव (रायगड) येथे मराठेंच्या घरी आलीस व नंतर भाइंदर (ठाणे) मुक्कामी आलीस. मुळात तू माझ्या आयुष्यात येण्यास कारणीभूत झालीस ती तुझी मालुमावशी (मालाड) व कॅमलीन कंपनीमधील मित्र श्री व सौ. मुजुमदार मालाड यांच्यामुळे. साधारणत: अरेंज मॅरेजमधे कोणाला कोणाची तरी मध्यस्थी लागते. त्याच प्रमाणे मध्यस्थांच्यामुळे आपला पण विवाह ठरला. ज्या क्षणी आपली पसंती होऊन रितसर विवाह ठरला त्याचवेळी मला जाणीव झाली की आपल्या आयुष्यात एक मौल्यवान हिरा परमेश्वराने व ती भाऊ व आईनी पदरात टाकला आहे. या हिऱ्याचे एवढे असंख्य पैलू आहेत की त्याचे मोलच निराळे होते. आपला विवाह जसा तुझ्या मावशीच्या व मुजुमदार पती पत्नीच्या मुळे ठरला त्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता तसेच माझे मोठे मामा (अण्णामामा) व मोठी मामी म्हणजे मंगला निजसुरे व धाकटामामा (दिगुमामा) व धाकटी मामी शिला निजसुरे यांचाही होता. लग्न ठरवण्याची सगळी बोलणी बैठका मोठ्या मामांकडे झाली. पुढे खरेदी दागदागिनेही त्यांच्याच ओळखीच्या सोनाराकडे केले होते. माझी आई व अप्पा यांचा निजसुरे कुटुंबावर अतोनात प्रेम व विश्वास होता. त्यामुळेच मी पुढील शिक्षणाकरता व नोकरी धंद्याकरता विलेपार्ले येथे दोन्ही मामांकडे राहावयास आलो. पुढे मला नोकरी मिळाली, चार पैसे कमवावयास लागलो, थोडाफार स्थिर झालो. दोन्ही माम्यांनी व त्यांच्या कन्या शामा, रेखा व स्मिता यांनी पुढे आमचे बिऱ्हाड भाईंदर येथे मांडून देण्यापर्यंत सर्व व्यवस्था केली व त्या प्रेमाने तेव्हा आमच्या घरी भाइर्दर येथे, बोरीवलीला आल्यावरसुद्धा तेथे अधूनमधून राहावयास येत असत. त्यामुळे मामा मामी प्रमाणेच व मुलींप्रमाणे माझे मामे भाऊ श्री अनिल, श्री सुधीर, श्री अविनाश व श्री संजय ही भावंडे सुद्धा आमच्या खुप जवळ होती. त्याचप्रमाणे पुढे त्यांच्या पत्नीही जवळच्या झाल्या होत्या त्यामुळे आमच्या नात्याची वीण अधिक घट्ट होत गेली. प्रेम व स्नेह वाढत गेला. त्यामुळे जया (सौ. सुप्रिया)चे स्थान निजसुरे घराण्यात कायम प्रथम क्रमांकावर राहिले व तिने सुद्धा त्या घराण्यावर मनापासून प्रेम केले. आज आपण जे काही आहोत ते निजसुरे कुटुंबाच्या कृपेमुळेच आहोत याची जाणीव तिने मनाशी सतत ठेवली होती. सौ. जया (सुप्रिया) माहेरी जशी आई भाऊंची लाडकी होती तशीच तिच्या ताईची-नानांची व सर्व भाऊ-भावजया, भाचे-भाच्यांची सुद्धा लाडकी होती. भाऊ व आईच्या नंतर ती दादा व वहिनीला आई-भाऊंच्याच जागी मानत होती. हे झाले माहेर बाबत ते बहुधा प्रत्येक मुलीच्या बाबतीत असू शकते. परंतु जया सासरी मराठ्यांच्या घरातसुद्धा तेवढीच प्रिय होती. ति. अप्पा माझे वडील व आईला कधी तिने सासु सासरे मानले नाही. तिने आपल्या सासुबाईंशी कधी मायलेकीचे नाते निर्माण केले कळलेच नाही. आई अप्पाही तेवढेच गुणी होते. तसेच माझे आजोबा व आजी सुद्धा होती. एक विनुकाका (अविवाहीत) होते. आमचे एकत्र कुटुंब असल्यामुळे मला बऱ्याच चुलत काका-काकू, चुलत आत्या, चुलत भाऊ/बहिणी होते त्यांच्या मध्ये आमची डोंबीवलीची सोनू आत्या व तिच्या तिन्ही मुली तसेच कल्याणचे विजय मराठे व त्यांच्या सौ. व आमची गोरेगावची शिला काकू या सर्वांवर जयाचे प्रेम होते. सगळे नातेवाईक होते. त्यांच्यासुद्धा सगळ्यांच्या मर्जीतली जया होती. त्यावेळी ते म्हणायचे की सून म्हणून मुलगी करावी तर रत्नागिरीची किंवा रत्नागिरी जिल्ह्यातली हे त्यांचे पर्वणीचे वाक्य होते. एवढेच काय परंतु नणंद-भावजयांचे नाते सुद्धा अभावानेच चांगले असते. माझी बहीण सौ. लता व तिचे पती सुरेश गोडसे व मुले संदीप, सागर व पुढे तिच्या सुनांचे सुद्धा जयाने प्रेमाने केले. त्यामुळे त्यांच्या घरात सुद्धा तिला खुप मान होता. आता आणखी एक गोष्ट लिहावयाची राहिली ती अशी की जयाला सहा मामा-मामी, दोन मावश्या व त्यांची मुले या सगळ्यांची सुद्धा लाडकी होती. तिला लाडाने जयु म्हणायचे. एवढेच काय अंजर्ले येथील माझे मामा, स्मिता मामी व त्यांची तिन मुले या सर्वांना सुद्धा जया बद्दल खूप आदर होता.

आमच्या मराठे घराण्यात जयाच्या सल्ल्याशिवाय कुठलीही गोष्ट होत नसे. प्रत्येक कार्यात तिचा पुढाकार असायचा. ती म्हणेल तो शब्द प्रमाण मानला जायचा. कुठल्या आणि किती नात्यांबद्दल सांगायचे माझा धाकटा भाऊ राम व त्यांची पत्नी राजश्री त्यांची तिन्ही मुले सौ. स्नेहा, सौ. श्रद्धा व वैभव व जावई

अजिंक्य आणि अमित आणि आत्ता सूनबाई म्हणून आलेली सौ. सायली व नातू चिन्मय व मल्हार जयाला प्रिय होती. विशेष सांगायचे म्हणजे जयाच्या मैत्रिणींबाबत त्यांना मैत्रिणी म्हणून संबोधणे चुकीचे ठरेल. मैत्रिणी नाहीत बहिणीच त्या शाळेतल्या मैत्रिणींचे एवढे ५०/६० वर्षे संबंध टिकविणे अगदी त्यांच्या मुलांपर्यंत ही गोष्ट सुद्धा अगदी दुर्मिळच आहे. सौ. माया, सौ. पुष्पा, सौ. रेखा, सौ. विद्या (गुरव) सर्वांचेच एकमेकांकडे अजून या क्षणापर्यंत येणे-जाणे चालू आहे. त्यामध्येच सौ. अंजू भागवतचा ही समावेश आहे. भिशी व समीतीच्या सर्व मैत्रिणी, आणखी अनेक कुटुंब आहेत त्यांची यादी द्यावी तेवढी थोडीच आहे. उदा. देवधर, सावंत, माने, पेंढारकर, देवल, डॉ. सावंत, भावसार (न्यू. गजांत परिवार), शुभांगी बाक्रे, नारकर, गायकर, असोलकर, गांधी, हेबळे, शिंदे, हंबीर, मनोज आचार्य,शोभा नाखरे, सतीश भावसार, जगदीश भुवड, चेतना वडके, नितीन खैरे आणि चिंचणीकर, राजेंद्र पवार, मंगेश पवार, रूपेश पवार, डॉ. दांडेकर, डॉ. रानडे, कोकजे, शिवराम मुळे, शरद जोशी, एकनाथ करंदिकर, पराग पाटील, अरुण पुजारी (भाईंदर), गजू जोशी, पणशीकर, डॉ. एस. डी. कुलकर्णी, मंदा चोणकर, रायगड-गोरेगावचे प्रसाद पेंडसे आणि डांगे अशा अनेक कुटुंबियांशी सलोख्याचे संबंध सौ. जयाने जोडले होते. याचे कारण म्हणजे जयाचा स्वभाव व प्रत्येकावर असलेले निस्सीम प्रेम. जयाच्या माणसे जोडून ठेवण्याच्या स्वभावाबद्दल आणखी विशेष सांगावे लागेल ते असे की, भाईंदर पासूनच्या माई-अप्पा, शशांक मध्ये आल्यावर कामाला येणार्या कदम मावशी, विजूची आई तसेच न्यू गजांत मध्ये आल्यावर तिथे कामाला येणाऱ्या निर्मला, वंदना, सुवर्णा व अरूणा अशा सर्वांना विस वर्षांपेक्षा अधिक काळ सांभाळून ठेवणे हे क्वचीतच घडते.

जया आज तुला हे जग व आम्हा सर्वांना सोडून जाऊन एक महिना झाला. प्रत्येक सेकंद, प्रत्येक मिनिट, प्रत्येक तास, महिना, वर्षे अशीच जात राहणार. आम्ही सर्व तुला प्रिय असणारी माणसे आणि स्वत: मी आम्ही या जगात असे पर्यंत व आमच्या शेवटच्या श्वासापर्यंत तुझ्या प्रत्येक आठवणी व तुला स्मरण केल्या शिवाय राहणार नाही. असे म्हटले जाते की, काळ कुणासाठी थांबत नाही. प्रत्येक जन्माला आलेल्या व्यक्तिला एक दिवस या वाटेने जावेच लागणार, कोणी आधी, कोणी नंतर एंट्री एक्सिट असतेच, भोग, नियतीचे खेळ या साऱ्या शब्दांचा किंवा अशाच काही तत्सम शब्दांचा वापर केला तरी मनाची समजूत काढणे ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. मला सर्व सांगत आहेत की, आता तुम्हाला सावरायला हवं, स्वप्ना, किरण आणि नातींकडे बघा. परंतु जया मला तू सल्ले देत होतीस या जगात असताना, काही गोष्टी सांगत होतीस, रागावून कधी समजूतीने सुद्धा सांगत होतीस. तसेच या अतिशय दु:खद प्रसंगी तू मला दु:ख विसरण्याचा मार्ग दाखव. तुझ्या स्वभावातला मृदुपणा, लोभसपणा, प्रेमळपणा, दरारा, आदरयुक्त भिती, माणसांचा संग्रह आणि शृंखला तयार करण्याची हातोटी यामुळे तुझी सर्व तमाम माणसे तुझ्या बद्दलच्या आठवणी तू त्यांना वेळोवेळी केलेली मदत, निरनिराळ्या मार्गांनी मदत कधी सल्ले देऊन, कधी समजावून, कधी उपदेश करून व आर्थिक व शारीरिक मदतीचा सुद्धा हात दिलास. त्या आठवणी सांगण्यासाठी अनेक जण पुढे येत आहेत. तू कोणा कोणासाठी काय काय म्हणून केलेस याची मला कल्पना सुद्धा नव्हती. काहींच्या बाबतीत माहिती होती व काहींच्या नव्हती. तुझा प्रसिद्धी पासून दूर राहण्याचा स्वभाव, कर्तव्य बजावायचीस पण त्याची कुठेही वाच्यता करायची नाहीस, कुठलाही हव्यास नाही, हाव नाही. त्यामुळे आम्हाला कधी कळलेच नाही. तुझ्या नाती स्मृती-सृष्टी, किरण-स्वप्ना व इतर सर्व नातेवाईक व स्नेही मंडळी सांगतात की आई आपल्यातच आहे त्यामुळे तुम्ही रडत बसू नका, रडलात तर आईला बरे वाटणार नाही उलट दु:खच होईल. हे सर्व पटवून घेण्यासाठी मी अजून कमी पडत आहे. हे पटवून देण्याची ताकद मला परमेश्वराने तुझ्या रूपाने द्यावी हीच प्रार्थना.

आता माझा सांभाळ करण्यासाठी किरण-स्वप्ना, नाती स्मृती-सृष्टी, राम-राजश्री, वैभव-सायली, माधव पोंक्षे-स्मिता, उदय-माधुरी, नितीन-मेधा, अजिंक्य-स्नेहा, अमित-श्रद्धा, मनिष-मयुरा सर्व जोशी कुटुंबीय व अरूण डोळस कुटुंबीय अशी इतर नातेवाईक तुझ्या प्रेमामुळे माझी काळजी घेतीलच. इतकेच काय आपली शलाका नारकर, आपली स्वप्ना पाटील सुद्धा माझी काळजी घेतीलच.

८ जानेवारी २०२० रोजी आपल्या लग्नाला ४५ वर्षे पूर्ण झाली. या ४५ वर्षात अनेक चढ उतार झाले, संकटे आली पण केवळ आणि केवळ तुझ्या मुळे ४५ वर्षे आनंदात तुझ्या बरोबर संसार करू शकलो. परंतु त्यानंतर मात्र तुला या जगात थांबावयाला व अधिक काळ जगायला व आजाराबरोबर अखेरचा लढा जिंकण्याची संधी तु आम्हाला कोणालाच दिली नाही. कोणालाही त्रास द्यायचा तुझा स्वभाव नव्हता. वास्तवीक आपला लाडका सुपुत्र म्हणजे समीर दिनांक २७/१/१९८८ रोजी आपल्याकडून नियतीनी हिरावून घेतल्यानंतर आता तुला पुन्हा हिरावून घेवून एवढे मोठे संकट माझ्यावर व आपल्या सर्व

कुटुंबियांवर येईल अशी पुसटशी सुद्धा कल्पना नव्हती. तरी सुद्धा अशी घटना घडावी हा नियतीचा आपल्यावर झालेला कोपच म्हणावा लागेल. कोणावरही कसलाही आपण भार टाकायचा नाही ही तुझी वृत्ती होती त्याप्रमाणे तु अखेरच्या क्षणापर्यंत वागलीस स्वत:शी प्रामाणिक राहिलीस. शेवटी ९ एप्रिल २०२० रोजी रात्री ९ वा. १० मि. आपला अखेरचा श्वास सोडलास. आम्ही सर्व कमनशीबी म्हणून तुझा सहवास आम्हाला मिळायचा कायमचा बंद झाला. हे आमचे दुर्दैवच म्हणावे लागेल. तू जिथे असशील तिथून आम्हा सर्वांना बघ, सर्वांना आशिर्वाद दे. स्वत:ला सुखी समाधानी ठेव. तुझ्या सर्व राहिलेल्या इच्छा असतील त्या तुझ्या नाती स्मृती-सृष्टी, स्वप्ना-किरण व मी असे पर्यंत मी व इतर सर्व प्रेमाची माणसे पूर्ण करण्याचा मनापासून प्रयत्न करू. आता जया तू तुंगा हॉस्पिटलमधील आयसीयूत असताना तुझ्याबद्दल तेथील सिस्टर व स्टाफने काढलेले उद्गार सुद्धा येथे सांगावेसे वाटतात. ते असे की 'आई अजून किती सुरेख दिसतात, किती वाचन करतात, पॉझिटिव्ह विचार करतात व त्यांची विल पावर वाखाणण्या सारखी आहे.' असे त्या स्वप्नाजवळ म्हणाल्या. यावरून मी म्हटलेल्या तुझ्या रूपाची व लोभसपणाची सुद्धा साक्ष पटते. आणखी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे, आम्हा कुणालाही तुला भेटून देत नसल्यामुळे तुला जे काही आम्हाला सांगायचे होते त्यासाठी तू सिस्टरकडे टिश्यू पेपर मागून घेऊन त्याच्यावर लिहून आम्हाला तो कागद बाहेर पाठवलास, त्यावरून तूझ्या कुशाग्र बुद्धीमत्तेची, तल्लख पणाची झलक दिसते त्याला सलाम.

आता या पत्राचा शेवट करण्यापूर्वी एक भाग राहून गेला तो म्हणजे तुझ्या प्रकाशन क्षेत्रातील कर्तृत्वाचा. जसे वैयक्तिक जीवनात आयुष्य जगताना तु जशी अफाट किर्ती मिळवलीस, सर्व प्रियजनांचे प्रेम मिळवलेस. तसेच नवचैतन्य प्रकाशन या तुझ्या संस्थेला सुद्धा अतिशय कल्पकतेने शिखरावर नेऊन ठेवलेस. या क्षेत्रात सुद्धा तू खूप नावलौकिक मिळवलास व पुरे पुर कसोटीला उतरलीस. आजमितीला नवचैतन्य प्रकाशन या संस्थेला म्हणजे जया तुला १० नामांकित संस्थांचे पुरस्कार प्राप्त झालेत. त्यातील अतिशय महत्वाचा पुरस्कार म्हणजे महाराष्ट्र शासनाचा २०११ सालचा प्रकाशन क्षेत्रातील योगदानाबद्दल तीन लाखांचा पुरस्कार मिळवलास. त्याच्यात विशेष म्हणजे आज महाराष्ट्रात नोंद असलेल्या ५००च्या वर प्रकाशन संस्था आहेत आणि महाराष्ट्र शासनाने हा पुरस्कार सुरू केल्यापासून चौथ्याच वर्षी तू मिळवलास (म्हणजे पहिल्या ५ वर्षांच्या आतच).


''उद्योगश्री'' पुरस्कार - प्रकाशन क्षेत्रातील काम करणाऱ्या 'स्त्री' प्रकाशिकेला प्रथमच मिळाला. मराठे प्रतिष्ठानचा पुरस्कार सुरू झाल्यापासून लगेचच दुसऱ्याच वर्षी 'यशस्वी स्त्री उद्योजिका' म्हणून पुरस्कार प्राप्त केलास. असे अणखी अनेक पुरस्कार सांगता येतील. तसेच नवचैतन्य प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ३१ पुस्तकांना शासन मान्य व इतर खाजगी संस्थांकडून पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्याचप्रमाणे निरनिराळ्या मान्यवर संस्थांकडून तुझे ११ सत्कार करण्यात आले आहेत. आत्तापर्यंत तू ११०० पुस्तके प्रकाशित करून ३५०च्या वर विख्यात साहित्यिकांची पुस्तके प्रकाशित करून सगळ्या महाराष्ट्रभर नवचैतन्यचे नाव केलेस. अनेक साहित्यिक तुझ्या म्हणजेच नवचैतन्याच्या व्यवहाराबद्दल व रिलेशनशिप बद्दल विशेष कौतुक करतात. पूर्वीच्या काळातील अगदी वि. वा. शिरवाडकर, मधु मंगेश कर्णिक, व्यंकटेश माडगुळकर, शं. ना. नवरे, दुर्गा भागवत, सुमती क्षेत्रमाडे, योगिनी जोगळेकर, कुमुदिनी रांगणेकर, शैलजा राजे, ज्योत्सना देवधर, निर्मला गोखले, माधवराव गडकरी, रत्नाकर मतकरी, विद्याधर गोखले, वि. स. वाळींबे अशी अनेक नावे सांगता येतील. त्या काळात आपण बऱ्याच साहित्यिकांकडे जोडीने जायचो, त्यावेळी ते आपल्याला लक्ष्मी नारायणाचा जोडा आला असे म्हणायचे. आताच्या लेखकांमध्ये विजयाताई वाड, मंगला गोडबोले, माधुरी शानबाग, वीणा गवाणकर, अंजली कीर्तने, शिरिष कणेकर, प्रवीण दवणे, सच्चिदानंद शेवडे, डॉ. मनोहर जोशी, डॉ. विजय ढवळे, प्रियंवदा करंडे, मनोज आचार्य, स्मिता भावसार, सतिष भावसार, रवी मुकुल, मंगला खाडीलकर, सुधाकर सहस्रबुद्धे, निलिमा प्रधान, निलिकाश प्रधान, गिरीश दाबके आणखी अनेक जुन्या नव्या पिढीतील नावे सांगता येण्यासारखी आहेत. मला आता सर्व लेखक मंडळी सांगतात की सुप्रियाताई जरी आता नसल्या तरी आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत. प्रविण दवणे सर तर त्यांच्या पत्रात अतिशय भावुक होऊन म्हणतात की वहिनींनी आय.सी.यू. मधे असताना माझी पुस्तके वाचावयास मागून घेतली व वाचली यापुढे मला सर्व पुरस्कार फिके आहेत. काय काय बोलावे, काय काय लिहावे तरी कमीच आहे. थोडक्यात काय 'मरावे तरी किर्ती रूपे उरावे' असंच आयुष्य तू जगलीस. सर्व क्षेत्रात पराक्रम करून, मराठे व जोशी घराण्यांचे नाव मोठे केलेस. कर्तृत्ववान स्त्री म्हणून सर्वजण तुझी दखल घेतील.

(बाबा)
शरद मराठे

♦

# लोकमान्यांना अपेक्षित भारत निर्माण होईल!

• प्रदीप मराठे, (पृ.५२९) साखळी, गोवा भ्रमणध्वनी : ९४२०६८७२२०



**लो**कमान्य बाळगंगाधर टिळक एक महान तत्त्ववेत्ता, आधुनिक भारताचे महंत, स्वातंत्र्यासाठी बलिदान देण्यास सज्ज पण तत्त्व न सोडता स्वाभिमानाने जगणारे, प्रत्येक अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारे नेते होते. प्रसंगी महात्मा गांधींना सल्ला देणारे असे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मार्गदर्शक नेते, काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्यात टिळकांचे तात्त्विक व वैचारिक मार्गदर्शन फार होते. टिळकांनी आयुष्यभर मोठ्या प्रमाणात राजकीय कृती करून मुत्सद्दीपणाने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीय जनतेला एकत्रित करण्याचा प्रयत्न केला. हे घडण्यासाठी ब्रिटीशाविरोधी हिंदुत्ववाद्यासंदर्भात सर्वसमावेशक औचित्य असणे आवश्यक आहे, असा त्यांचा विश्वास होता.

खरा प्रश्न आहे तो टिळकांना अपेक्षित स्वराज्य भारताला मिळाले का? सध्याची किंवा गेल्या सत्तर वर्षातील आपल्या देशाची वैचारिक प्रगती पाहता आपल्याला या प्रश्नाचे उत्तर नाही असेच मिळेल. लोकांनी लोकांसाठी लोकांचे राज्य चालविणे म्हणजे लोकशाही, स्वातंत्र्यानंतर आपण भले आपली काही प्रमाणात भौगोलिक प्रगती केली असेल, पण टिळकांना अपेक्षित स्वराज्य आपण मिळविले का? याचा शोध आपण घेतला पाहिजे. कारण जोपर्यंत देशात वैचारिक क्रांती होत नाही, सर्वसमावेशकता, समानता येत नाही, गरीब श्रीमंत ही दरी कमी होत नाही तोपर्यंत आपल्याला खरे स्वराज्य मिळणार नाही. दुर्दैवाने आज आपल्या देशात अराजकता, अनैतिकता यातच जास्त वाढ होत आहे. भ्रष्टाचार व स्वैराचार हाच आज शिष्टाचार झाला आहे. आणि याला आपण जबाबदार आहोत.

टिळकांनी अशा स्वैर स्वातंत्र्याचा, स्वराज्याचा कधीच विचार केला नव्हता. मागील सत्तर वर्षातील देशाची राजकीय परिस्थिती पाहता राज्यकर्त्यांनी राज्यघटनेतील पळवाटा शोधात लोकशाहीची थट्टाच केली असे म्हणावे लागेल. पहिले म्हणजे स्वातंत्र्य मिळवताना आपले तत्कालीन काँग्रेस नेते देशाची फाळणी टाळू शकले नाहीत आणि फाळणी होऊनसुद्धा आजपर्यंत शेजारील देशांकडे आपले राज्यकर्ते संबंध सुधारू शकले नाहीत, किंबहुना आपले संबंध बिघडतच गेले. पुन्हा १९७१च्या युद्धात आपल्याला आणखी एका फाळणीला सामोरे जावे लागले. शेजारी देशाकडे आपण तडजोड करत गेलो आणि 'बुडत्याचा पाय खोलात' या उक्तीप्रमाणे आपण अजूनही त्याचाच सामना करत आहोत. आता तर उत्तरेकडील शेजारीही नव्या दमाने भारताविरुद्ध युद्धाची तयारी करताना दिसतोय. याला काही अंशी आपले परराष्ट्र धोरण कारणीभूत असेल. फक्त नशीब एवढेच की स्वातंत्र्यानंतर बऱ्याच वर्षांनी एक देशप्रेमी नेता आपण पंतप्रधान म्हणून निवडलेला आहे.

लोकमान्य टिळकांनी भगवद्‌गीता हा संस्कृत ग्रंथ आपल्याला समजण्यासाठी आपल्या भाषेत भाषांतर करून टीकात्मक गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी माणसांच्या रोजच्या जीवनात माणसाचे वर्तन कसे असावे याविषयी भाष्य केले आहे. पण, आपण आज भगवद्‌गीता विसरून भलत्याच मार्गाने जात आहोत.

टिळकांनी अर्थव्यवस्थेविषयी सुद्धा आपल्या केसरी व मराठामध्ये लेखन केले आहे. त्यांच्या मते आपल्या दारिद्र्याची कारणे कोणती हे आपणास समजले तरच त्यावर योग्य उपाय करता येईल. टिळकांच्या मते कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था बळकट होणार असेल तर देशातले उत्पन्न वाढले पाहिजे आणि ते देशात राहिले पाहिजे आणि उत्पन्नाचा जर बराचसा भाग देशाबाहेर जात असेल आणि उत्पन्न घेणाऱ्यापेक्षा अनैतिकतेने खाणारेच जास्त असतील, तर अर्थव्यवस्था खिळखिळीच होत जाणार. दुर्दैवाने आज आपल्या देशाची परिस्थिती लोकसंख्यावाढीमुळे काही अंशी अशी झाली आहे. आणि याचमुळे एवढ्या वर्षानंतरही उत्पन्न वाढूनसुद्धा आपल्या देशाची प्रगती अपेक्षित वेगाने होत नाही. दुसरे टिळकांच्या मते देशात मिळणारी मूलद्रव्ये ओळखून त्यांचे उत्खनन करण्यास नवनवीन खाणींचा शोध घेऊन त्याप्रमाणे काम केले व धोरण ठरवले तर अपेक्षित विकास साधता येऊ शकतो. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर एवढ्या वर्षात आपण आपल्या देशाच्या नैसर्गिक साधन

संपत्तीचा संपूर्ण शोध घेऊ शकलो नाही. या साधनसंपत्तीचा अपेक्षित उपयोग करण्यासाठी लागणारे ज्ञान, कौशल्य, निपुणता प्राप्त करण्यासाठी आपल्या इंजिनिअर तंत्रज्ञ यांना परदेशात आपण पाठवतो. पण, तिथल्या वाढीव आर्थिक मिळकतीमुळे ही लोक पुन्हा भारतात येत नाहीत आणि अपेक्षित विकास साधला जात नाही. एकंदर पाहिलं तर आपल्याकडे इच्छाशक्ती, विशेषतः राजकीय इच्छाशक्ती असली तर अपेक्षित प्रगती होऊ शकेल. नाही म्हणायला आता ७० वर्षानंतर तरी आपण अशा उंबरठ्यावर उभे आहोत की यापुढे तरी देशात रामराज्याचा पाया घातला जाईल. पण हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा आपल्या देशाची अर्थव्यवस्था बळकट होईल आणि गरीब श्रीमंत समानता येईल. नैसर्गिक आपत्ती येतच राहणार पण त्यावर मात करूनच आपण पुढे जायला हवे. आशा करूया करोनानंतरच्या युगात भारत एक महासत्ता म्हणून उदयास येईल व टिळकांना अपेक्षित भारत देश निर्माण होईल.

♦

---

आपल्या मराठीची एक गम्मत आहे. यात वस्तूंना नावं खूप सुंदर दिली आहेत. साधारण पणे मोठ्या वस्तूंना पुल्लिंगी आणि त्याच्याशी संबंधित लहान, नाजूक आणि हालचाल जास्त करणाऱ्या वस्तूंना स्त्रीलींगी नावं दिलेली आहेत. तसेच बहुतेक वेळा या वस्तू एकमेकांना पूरक आहेत. बघा वाचून मजा येईल.

## जराशी गम्मत

ती कैरी आंबट,
तो आंबा गोड

ती चांदणी लुकलुकणारी,
तो चंद्र तेजोमय

ती वेल नाजूक,
तो वृक्ष मोठा

ती फांदी छोटीशी,
तो बुंधा जाड

ती झुळूक सुखावणारी,
तो वारा सोसाट्याचा

ती माळ नाजुकशी,
तो हार मोठा

ती साखळी नाजुकशी,
तो साखळदंड मोठा

ती बांगडी नाजुकशी,
तो कडा जाड

ती कविता गोड,
तो धडा रटाळ

ती घागर, कळशी,
तो माठ, रांजण, घडा आणि हंडा

ती सुरी, तो सुरा
ती ओळ, तो परिच्छेद

ती नदी वाहणारी,
तो सागर अथांग

ती झोपडी, माडी लहान
तो महाल, बंगला महान

ती खिचडी साधीशी,
तो मसाले भात आणि पुलाव

ती मीटिंग, तो परिसंवाद
ती खिडकी, तो दरवाजा

ती टेकडी छोटीशी,
तो डोंगर भलामोठा

ती जखम लहान,
तो घाव मोठा

ती दोरी बारीकशी,
तो दोर जाडसर

ती डबी छोटीसी,
तो डबा मोठा

ती थाळी, तो थाळा
ती पोळी, भाकरी साधी,
तो मात्र पराठा आणि ब्रेड

ती सायकल, स्कुटी, रिक्षा, बस
तो ट्रक, रणगाडा बडा

ती पाटी छोटी
तो फळा मोठा

ती वाटी, तो कुंडा
जीवनाचा पण हाच आहे ना फंडा...

---

घालीन लोटांगण, वंदीन चरण
डोळ्यांनी पाहीन रुप तुझें ।
प्रेमें आलिंगन, आनंदे पूजिन
भावें ओवाळीन म्हणे नामा ।।

आरती झाल्यानंतर नेहमी आपण हे संत नामदेव महाराजांचे पद म्हणतो। पण या पदाचा खरा अर्थ खूप छान समजावून सांगितला आहे मुळात हे पद असे नाहीच, खरे पद खाली देत आहे.

घाली न लोटांगण,वंदी न चरण
डोळ्यांनी पाही न रूप तुझे ।
प्रेमे आलिंगन,आनंदे पूजिन
भावे ओवाळीन म्हणे नामा ।।

भगवंता मी तुला लोटांगण घालत नाही की तुझे चरण पूजन करीत नाही की तुझे रूप कसे आहे हे डोळ्यांनी पाहात नाही।तर तुला मी प्रेमाने आलिंगन देऊन आनंदाने पूजतो व भक्तिभावाने ओवाळतो।

किती सुंदर अर्थ सांगितला आहे या पदाचा।मी तर अवाक झालो। आपण म्हणत काय होतो आणि नेमका काय अर्थ आहे या पदाचा हे कळले।

# सदगुरू कित्ती छान सांगतात

कुटुंबप्रमुख पुरुषाला वाटतं की मी कमवतोय म्हणुन घरातली माणसं जीवन जगत आहेत.
पण खरं तर सदगुरू सांगतात की तसं नाहीए. घरातली माणसं जगावीत या देवाच्या इच्छेमुळे तुझी कमाई चालु आहे. त्यांना टाकुन दे मग तुझी कमाईच खाली गडगडेल. अधोगती होत जाईल.
घरच्या बाईला देखिल वाटतं की मी कामं करते म्हणुन घरातली माणसं जेवतात, धुतलेले कपडे घालतात वगैरे वगैरे.
पण सदगुरू सांगतात की त्यांच्यासाठीच तुला शक्ती दिलीय. चांगलं आरोग्य दिलंय. त्यांना टाकशील तर राहिल का आरोग्य जागेवर?


खरंय...
आपल्या घरातल्यांच्या नशीबाची आपल्याला साथ असते म्हणुन आपण प्रगती करत असतो, कमवत असतो, कामे करत असतो. हे त्यांचे आपल्यावरच ऋण असते. पण आपण त्यांच्यावरच उपकार केल्यासारखं फिल करत असतो.
म्हणुन यापुढे असा विचार करायला लागेल की घरातल्या माणसांना मी सांभाळत नाहीये, तर घरातल्या माणसांसाठी सदगुरूंनी मला आत्तापर्यंत सांभाळलंय.
सदगुरूबोधाने गैरसमजांचा व अहंकाराचा कचरा दूर होऊन दृष्टीकोन स्वच्छ होतो.

**श्री राम समर्थ**
**जय जय रघुवीर समर्थ**

---

# मसाल्यातील पदार्थ - बडीशेप

**ब**डीशेपचा वापर मुख्यत्वे मसाल्यात व मुखशुद्धीत करतात. बडीशेपमध्ये अनेक गुणधर्म आहेत जे आरोग्य आणि सौंदर्यासाठी फायदेशीर आहेत. यामध्ये 'व्हिटॅमिन सी'चं प्रमाण भरपूर आहे, तसंच कॅलशियम, सोडियम, फॉस्फरस, आयर्न व पोटॅशियम सारखी आवश्यक खनिज गुणही आहेत. बडीशेपचे सेवन शरीर निरोगी राहण्यासाठी आवश्यक आहे.



खोकला झाल्यास बडीशेप मधातून चावून खाल्यास फरक पडतो. बडीशेप व खडीसाखर रोज खाल्यास तोंडाची दुर्गंधी दूर होते. बडीशेप नियमित सेवन केल्यास मासिक पाळीच्या तक्रारी दूर होतात, पाळी नियमित राहते. बडीशेप त्वचेसाठीही चांगली असते. बडीशेप गुलकंदासोबत दुधातून घेतल्यास बद्धकोष्ठतेची तक्रार दूर होते. स्मरणशक्ती, अपचन, ऍसिडिटी, पोटात दुखत असेल तर, घशात खवखव होत असेल तर बडीशेपचा खूप फायदा होतो. कॉलेस्ट्रॉल लेव्हल आटोक्यात ठेवते, ब्लडप्रेशर कंट्रोलमध्ये राहते. बडीशेप मध्ये भरपूर प्रमाणात पोटॅशियम असत, हे रक्तवाहिन्यांना लवचिक बनवत ज्यामुळे ब्लडप्रेशर नियमित राहते.ही बडीशेप आपल्या खूपच उपयोगी आहे.

*संकलन - शर्मिष्ठा शाखा, देवरुख*
राष्ट्र सेविका समिती
वृक्षवल्ली आम्हा सोयरे
जिल्हा रत्नागिरी
दिनांक ११/७/२०२०
औषधी वनस्पती क्र ११

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा    भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ५ वी आणि इयत्ता ८ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता ५ वी, रु. २००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/–
इयत्ता ८वी – रु. ३००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/–

२) इयत्ता १० वी – ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/– ९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/–

३) इयत्ता १२ वी –
आर्टस्/कॉमर्स :
७०% ते ८०%– रु. ७००/–
८०% ते ९०%– रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सायन्स : ८०% ते ९०% – रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/–

४) पदवी – B.A., B.Com. B.Sc.,
सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/–

५) पदव्युत्तर –M. A., M.Com., M.Sc.
प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/–
C.A., L.L.B., Enginear, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/–

६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय) राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५००/–
याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/– तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम – रु. १००/–
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम – रु. ५००/–
- (लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.)
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत (कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ). दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

यशस्वी व पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांनी दि. ३० सप्टेंबर २०२० पर्यंत आपापल्या गुणपत्रिकांची प्रत मराठे प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पोस्टाने अथवा info@marathepratishthan.org या ई–मेलवर पाठवावी. विजेत्यांची सूची या वर्षीच्या वार्षिक अहवालात प्रसिद्ध करण्यात येईल. तरी निकाल प्राप्त झाल्यावर लगेचच गुणपत्रिका पाठवाव्यात ही विनंती.

लॉकडाऊनमुळे निकाल वेळेवर लागले नाहीत तरी ज्या विद्यार्थ्यांना निकाल मिळाले असतील वरील नियमांमध्ये बसत असतील त्यांनी आपली गुणपत्रिका दिलेल्या ईमेलवर मुदतीपूर्वी पाठवून द्यावीत.

**ई–मेल : info@marathepratishthan.org** ♦

# माझी कोरोनावारी

• योगेश रा. गाडगीळ, पुणे भ्रमणध्वनी : ९७६६३ २८४२९

**२१** जुलैला कोरोनाची टेस्ट झाली. एकदम चाळीस पंचेचाळीस टेस्ट एकाच दिवशी झाल्या. त्यामुळे जरा दगदग झालीच होती. त्यातच बराच वेळ लागल्यामुळे 'दुपारचे जेवण' असे झालेच नाही घरी आलो तर पाय खूप दुखायला लागले होते. आंघोळ करून जेवलो व झोपलो तेव्हा ताप भरला खूप नव्हता पण साडेशंभर होता. मनात शंकेची पाल चुकचकली पण वाटले दगदगीमुळे असेल. तसेच रिपोर्ट येईपर्यंत आयसोलेशन मध्ये रहा अशा सूचना होत्याच. त्यामुळे त्यादिवशी एकटाच झोपलो.

२२ तारीख उजाडली. रिपोर्ट निगेटिव्ह येणार ही खात्री मनात होतीच. त्यामुळे निर्धास्त होतो व रोजची दैनंदिन कामे चालू होती. ११:१५ला सरांचा फोन आला, रिपोर्ट पॉझिटिव्ह आहे म्हणून. ऐकल्या ऐकल्या दोन मिनिट स्तब्ध झालो. डोळ्यांच्या कडा पाणावल्या. मानसीला सांगितले, तीही जरा हदरलीच. पण ठरवले आता हे काही निर्णय घ्यायचे आहेत ते आपणच. मग माझ्या मित्राला फोन करून दीनानाथ हॉस्पिटलची होम क्वारंटाईनची प्रोसिजर काय असते ते समजावून घेतले. तसेच घरच्यांच्या व मोहिनी, राहुल व आयुष (वाडदेकर कुटुंब) यांच्या टेस्ट करून घ्यायच्या दृष्टीने विचार चालू केला. मला बाकी कोणाचे एवढे टेन्शन नव्हते जेव्हढे सासुबाईंचे होते. कारण त्यांना बीपी व डायबिटीसचा त्रास आहे. लॉकडाऊनच्या काळात आम्हीच त्यांना आमच्या घरी राहायला बोलावले होते. त्यामुळे 'हात दाखवून अवलक्षण' अशीच परिस्थिती होती. त्यामुळे घरच्या सर्वांची स्वॅब टेस्ट व राहुल, मोहिनी, आयुषयांची रॅपिड टेस्ट करायचा निर्णय घेतला. ह्यावेळी प्रकर्षाने आठवण झाली ती बाबांची. कारण ह्या आधी ज्या ज्यावेळेस असे काही झाले होते, तेव्हा त्यांनीच दरवेळी माझी पूर्ण जबाबदारी घेतली होती. अगदी लग्न झाल्यावरसुद्धा. पण बाबांची उणीव मानसीने भरून काढली व भविष्यकाळासाठी मी पण निश्चिंत झालो.

आता रिपोर्ट यायचीचं प्रतीक्षा होती. तोपर्यंत काहीच करू शकत नव्हतो. ह्यादरम्यान मानसीच्या मावशीच्या मिस्टरांचे कोरोनामुळेच निधन झाल्याची बातमी दुपारी कळली. त्यामुळे मानासीची मानसिक अवस्था खूपच अस्वस्थ होती साधारण साडेसहा वाजता व्हॉट्सॲपवर रिपोर्ट मिळाला. तोपर्यंत दीनानाथला जायचे निश्चित झाले होते. पण होम क्वारंटाईन सासूबाईंच्या फ्लॅटमध्ये जाऊन व्हायचे की आपल्याच घरी व्हायचे हे ठरले नव्हते. मग मानसीने चौकशी केली असता असे कळले की दीनानाथची कोव्हिड ओपीडी रात्री दहा वाजेपर्यंत चालू असते मग माझ ठरत नव्हत की रात्री जावे का सकाळी लवकर जावे पण मोहिनी व हृषिकेश आणि रेषा ह्यांचे असे मत पडले की रात्रीच जाऊन यावे जेणेकरून औषधोपचार लगेच चालू होतील. तसेच रेषा व हृषिकेशने सांगितले की आम्ही दोघे दीनानाथला येतो. तू घरून डायरेक्ट दीनानाथला ये. रेषा हृषिकेश आणि माझे ऋणानुबंध काही वेगळेच आहेत. मला काही अडचण आहे आणि हे मदतीला नाहीत असे गेल्या तीन वर्षात कधीच झाले नाही. मग ठरल्याप्रमाणे आम्ही दीनानाथला जाऊन आलो. तिथे त्यांनी मला चेक केले व होम क्वारंटाईनसाठीचे जे निकष होते त्यात मी सहज बसल्यामुळे मला त्यांनी २२ जुलै ते ७ ऑगस्ट असे १७ दिवस होम क्वारंटाईन केले व त्याचबरोबर औषधे ऑक्सीटमीटर, थर्मामीटर, मास्क, ग्लोव्हज, टॅबलेट असे किट दिले. आणि मग माझा १७ दिवसांचा वनवास चालू झाला.

तोपर्यंत हेही ठरलं होते की मी घरीच राहणार आणि बाकी घरचे सासूबाईंच्या फ्लॅटवर राहायला जाणार. दुसऱ्या दिवशी सकाळी घरातील सर्वांची स्वॅब टेस्ट झाली आणि आजी व नातवंडे ह्यांची रवानगी त्यांच्या फ्लॅटवर झाली.. मला जरा अशक्तपणा जाणवत होता व तसेच प्रचंड अंगदुखी व ताप ह्यामुळे मीच मानसीला एकदोन दिवस थांब असे सांगितले दरम्यानच्या काळात व्हायरल इन्फेक्शनने त्रास होतात ते चालू झाले होते. अंगदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, वयाबरोबरच थोडासा ताप असे चक्र चालू झाले होते. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ह्या चौघांचे रिपोर्ट आले व ते माझ्या नशिबाने निगेटिव्ह आले. तसेच मोहिनी राहुल व आयुष ह्यांचेहि रिपोर्ट निगेटिव्ह आल्यामुळे मी सुटकेचा निःश्वास सोडला. पण एक गोष्ट मात्र निश्चित की राहुलने त्याच्या भिडे बागेतील फ्लॅटवर जायच्या आधी मानसीला जे काही लागेल ती सगळी मदत केली होती. तसेच सुवर्णा व मंदार जोशी ह्यांनी मला जी काही आयुर्वेदिक औषधे लागत होती ती पुण्यात अरेंज करून दिली होती.

ती औषधेसुद्धा राहुलनी आणून दिली. ही बातमी कळल्यावर माझ्या सर्व बहिणी, मेव्हणे, आत्या, नाना, भाऊ, वहिनी, इतर नातेवाईक, मित्र व आनंद केळकर आणि कंपनीतील इतर सहकारी ह्या सर्वांनी मला फोन करून खूप मानसिक आधार दिला. तसेच मी सुद्धा थोडा मनावर दगड ठेवून मानसीलाही लगेचच आईकडे पाठवून दिले. रोज सकाळी उठल्यावर चहा करून घेणे, नंतर हळद दूध, च्यवनप्राश घेणे, नंतर उकडलेले अंडे खाणे, अंघोळ, जेवण, थोडी विश्रांती, संध्याकाळचा चहा, मग मानसीने पाठवलेले सूप/सरबत व रात्रीचे जेवण तसेच दररोज न चुकता आंघोळी आधी व झोपण्याआधी वाफ घेणे ठरलेली औषधे घेणे असा माझा दिनक्रम होता. ह्या दिवसात माझा मेव्हणा श्रीधर न चुकता सकाळी उकडलेले अंडे आणून देत असे. तसेच जेवण व सूप वरुण/अवनी/मानसी जसे जमेल तसे वेळेत आणून देत होते. साधारण दहा ते अकरा दिवस मला व्हायरल इन्फेक्शनचा त्रास होता. मग मी जेव्हा अगदीच सहन होत नव्हते त्यावेळी अक्कलकोट स्वामीना साकडे घातले. मग माझा व्हायरलचा त्रास क्रमक्रमाने कमी होत गेला. पण अशक्तपणा जायला मात्र पूर्ण १७ दिवसांचा काळ लागला. पहिले दहा अकरा दिवस जेव्हा त्रास होत होता तेव्हा मात्र मी मास्क वापरणे, ग्लोव्हज वापरणे, मी हात लावलेल्या वस्तू डेटॉलच्या पाण्याने सॅनिटाइज करणे हे नेमाने करत होतो. तसे हा १७ दिवसांचा अनुभव एकटेपणाची जाणीव करून देणारा, सहनशक्तीची परीक्षा पाहणारा, तसेच स्वयंशिस्त शिकवणारा असा काहीसा वेगळाच होता. तसेच सध्याच्या परिस्थितीत कोरोना पेशन्टकडे समाज वेगळ्या नजरेने बघतो पण माझ्या सुदैवाने आमच्या सोसाटीतील लोकांनी खूपच सकारात्मक प्रतिसाद दिला, त्यामुळे अशी कधीच जाणीव झाली नाही. पण एकमात्र खरे की घाबरून जाण्यासारखे खूप काही नव्हते. तसेच जन संचायचा कसा फायदा होतो ह्याची प्रचिती परत एकदा आलीच. अशीही माझी कोरोनावारी १७ दिवसांनी पूर्ण झाली व मग मी परत माझे रूटीन चालू केले. परत एकदा बाबांनी सांगितलेली उक्ती सार्थ ठरली–

*धन संचय केला नाहीस तरी चालेल*
*पण जनसंचय मात्र नक्की कर.*

♦

---

# कविता

काम, क्रोध, लोभ, मोह, मद
आणि मत्सर हे सहा दोष...
यांनाच षड्रिपु म्हणतात.

फार्सी भाषेत यांना ऐब म्हणतात.
हे सहा ऐब ज्याच्या अंगी
ठासून भरलेले असतात
त्याला साहेब म्हणतात...

या सहा दोषांना सहज धारण
करणाऱ्यास साधारण म्हणतात...

या सहांना मान्य करणाऱ्यास
सामान्य म्हणतात...

या सहांना आपल्या धाकात
ठेवणाऱ्यास साधक म्हणतात...

या सहांना अधू करणाऱ्यास
साधू म्हणतात...

या सहांचा संपूर्ण अंत करणाऱ्यास
संत म्हणतात...

आणि या सहांचा अर्थ नीट समजून
घेऊन जो स्वतःची आत्मोन्नती करतो
त्याला समर्थ म्हणतात...

# पत्नी म्हणजे...

प्रेम, त्याग आणि परोपकाराचं दुसरं नाव म्हणजे पत्नी. स्वतःच अस्तित्व विसरून साखर जशी पाण्यात विरघळते न अगदी तशीच सासरी विरघळून सासर गोड करणारी साखर म्हणजे पत्नी. कौतुक आणि कृतज्ञतेच्या गावी जाण्याचं स्वप्नही न पाहता आजन्म यंत्रवत विनामूल्य सेवा देणारी महात्यागी म्हणजे पत्नी. पदरी पडलेल्या आणि नंतर बदललेल्या पतीरुपी प्रियकराला जसा आहे तसा स्विकारून त्याच्या कुशीतच आपलं अस्तित्व शोधणारी प्रेमळ प्रेयसी म्हणजे पत्नी. स्वतःच्या जीवातून नवा जीव घडविणारी विश्वनिर्माती म्हणजे पत्नी. उंबरठ्याबाहेर पडल्यावर वेदना पिऊन सासरची गोडवे गाणारी थोर स्त्री म्हणजे पत्नी. माहेरी गेल्यावर कायम सासरची ओढ असणारी माहेरची लेक म्हणजे पत्नी. सगळं संपून अनंताच्या प्रवासाला निघतानाही सासरकडून कोणतीही अपेक्षा न ठेवता माहेरची साडी नेसून स्वर्गस्थ होणारा देह म्हणजे पत्नी.

♦

# मुरड कान्होला

• संजय मराठे (पृ.४१६), अमरावती
भ्रमणध्वनी : ८२३७९३३०६८

**आ**जी गणेश चतुर्थी साठी मोदक करत होती. गौरव गिरीजा जवळच बसुन बारिकपणे निरिक्षण करीत होते. शेवटी आजीने मोदक तळायला घेण्यापूर्वी दोन वेगळ्याच आकाराचे दोनचार मोदक आणि करंज्या ही सारण भरून करून घेतल्या. चौकस गौरवने लगेच आजीला विचारले यांचा आकार वेगळा का गं केला आजी?

आजी म्हणाली, अरे यांना मुरड कान्होला म्हणतात. हे गणपतीला विशेषकरून आवडतात. गौरव गिरीजा ने एकदम एकत्रच विचारले, हेही इतर मोदक आणि करंज्यापेक्षा काही विशेष वेगळे नाहीत, फक्त तु करंजी कातण्याने आकार देऊन कापण्या एवजी, त्याचा काठ दुमडला आहेस.

आजी म्हणाली, त्यालाच मुरड म्हणतात. पण आजी हे गणपतीला खास करून का आवडतात ते सांग ना!

आजी म्हणाली, अरे गणपती विद्येची देवता आहे ना, ती म्हणते शिकत असतांना कान्हुल्यांनी म्हणजे तुमच्या सारख्या लहानांनी ईतर गोष्टींना आणि आवडींना मुरड घालावी, म्हणजे त्यांच्या साठी हट्ट आणि अट्टाहास करू नये. अशी आपल्या अवास्तव मागण्यांना मुरड घालणारी कान्हुली मुले ही त्याला आवडतात.

आता हे बघा, ही कातण्याने कातलेली करंजी तळतांना फुटली आणि सारण बाहेर येउन करपलं. पण ही काठ दुमडलेली, म्हणजे मुरड घातलेली करंजी पहा कशी घट्ट चिकटलेली आहे. आणि पहा कशी टम्म फुगुन खुसखुशीत ही झाली आहे.

आजीने मुलांचे लक्ष अभ्यावर केंद्रित रहावे, इतर फालतु मागण्या करू नये म्हणून आजीने केलेला संस्कार माझ्या मुलांच्या मनावर पक्का कोरल्या गेलाय.

गौरवला पुण्या, मुंबईला इंजिनिअरिंगला ओपन कोट्यातून अँडमिशन नाही मिळू शकली तर त्याने अमरावतीच्या सरकारी काँलेज मधुन इंजिनिअरिंग केले. आणि बाईकचा हट्ट न करता चारही वर्षे लुना घेऊन काँलेजला गेला. मला फक्त एकदा गमतीने म्हणाला, मी काँलेजला गेलोय की नाही याची खात्री करायची असेल तर फक्त पार्किंगमध्ये दुरून ही नजर टाकून ओळखु शकता. सर्व बाईक आणि स्कुटी दिसतील. लुना फक्त एकच (माझी) असेल.

गिरीजाला ही डॉक्टर व्हायचे होते, ओपन कोट्यात प्रवेश पहिल्या राउंडला नाही मिळाली, पण जेंव्हा शेवटच्या राऊंडमध्ये ग्रँटच्या काँलेजला अमरावतीमध्ये आयुर्वेदिक काँलजला अँडमिशन मिळाली, तर त्यातूनच वैद्यकीय शिक्षण घेतले.

अशी ही मुरड कान्होलाची साठा उत्तरी कहाणी पाचा उत्तरी सफल संपूर्ण.

आवडली आणि भावली तर तुमच्या ही मुला मुलींना, नातवंड, पतवंडांना सांगा. ♦

# शिक्षक दिवस

भर चौकात कॉन्स्टेबलनी देशपांडे गुरुजींची गाडी अडवली आणि विना हेल्मेट गाडी चालवल्याबद्दल चलनाची रक्कम भरण्यास सांगितले. ती रक्कम पाहून गुरुजीना चक्करच यायची बाकी राहिलं! गुरुजी हतबल होऊन कॉन्स्टेबलला विनंती, गयावया करत आपली अडचण सांगू लागले. यावर तो कॉन्स्टेबल गुरुजींना म्हणाला, हे बघा गुरुजी मी काहीच करू शकत नाही, आत आमचे साहेब बसलेत, त्यांना तुमची अडचण सांगा, कदाचित ते तुमची अडचण दूर करू शकतील. गुरुजी आतल्या खोलीत गेले आणि त्यांनी नम्रपणे साहेबांना आपली अडचण सांगितली. साहेबांनी गुरुजींना वरपासून खालपर्यंत न्याहाळले आणि कॉन्स्टेबलला दंडाचे पावती पूस्तक आणायला सांगितले. कॉन्स्टेबलनी धावत येऊन साहेबांना पावती पुस्तक दिले.

साहेबांनी ते उघडले आणि त्यात काहीतरी लिहून एक चिठ्ठी गुरुजीच्या हातात दिली. दंडाच्या रक्कमेन आधीच त्यांच्या डोळ्यात पाणी तरळले होते. त्यांनी ती चिठ्ठी उघडली आणि वाचली... आदरणीय श्री देशपांडे गरुजी, ओळखलत का मला? मी आपल्या वर्गातला सर्वात मठ्ठ परंतु टारगट विद्यार्थी, जो वर्गात नेहमी सर्वात शेवटच्या बँचवर बसायचा, सदा पाटील. आज एवढ्या वर्षांनी आणि ते ही शिक्षक दिनी आपणास पाहून मला खूप आनंद झाला आहे. आपणावर

*(पान २७ पाहा...)*

# दुबई सहल

• श्री. विजय मराठे, पुणे भ्रमणध्वनी : ९४२०४८१४४९

२०१४च्या डिसेंबरची गोष्ट, माझ्या आणि अंजलीच्या लग्नाला २५ वर्षे झाली म्हूणन आम्ही एक संगीत कार्यक्रम केला होता. तेव्हापासून माझी मुलगी कु. धनश्रीच्या मनात आमच्यासाठी काहीतरी वेगळे करावयाचे डोक्यात होते. त्याप्रमाणे तिने आमचा एक स्नेही सचिन जोशी (दुबई) यांच्याशी संपर्क साधून आमच्या दुबई प्रवासाचे नक्की केले.

अंजलीचा चुलत भाऊ निशिकांत आणि केतकी ३१ डिसेंबर १४ रोजी पुण्यात आले होते. त्या रात्री मी अंजली, धनश्री, अथर्व, मोहन आणि मंजिरी मृण्मयी एकत्र नववर्षाच्या स्वागता करता रात्री जमलो होतो. बरोबर रात्रीचे बारा वाजले होते सर्वानी एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या, इतक्यात धनश्रीने एक आश्यर्यकारक घोषणा केली ती म्हणजे आमच्या पहिल्या दुबईच्या विमान प्रवासाची. आम्ही दोघेहि आचंबित झालो. एकमेकांकडे पाहून काही कळतच नव्हते, त्या रात्री घरी आल्यावर झोप लागत नव्हती. सर्व काही पुढील नियोजन कसे करावयाचे हेच डोक्यात, कशीतरी झोप लागली.

त्यासाठी लागणारे सर्व सोपस्कार धनश्री आणि कस्तुरी यांनी पार पडले (अंजलीला BSNL)ची परवानगी लागते परदेशी जायला) त्यानुसार ७ फेब्रुवारी १४ रोजी आम्ही मुंबईला जाण्यास तयार झालो, जाताना शाही बडदास्त होती. आमचा भाचा मयुरेश गाडी घेऊन आला होता. स्वारगेटहून वातानुकूलित व्हाल्वो बसने जायचे होते. (सर्वसाधारणपणे एशियाडने प्रवास). सर्वांचा निरोप घेऊन पहिल्या विमान प्रवासाला निघालो. गोरेगावला मंजिरी आणि मल्हार आले होते, मल्हार नि विचारले दुबई म्हणजे काय असते इतके हसायला आले ना. रात्रीचे जेवण झाले सुबोध (सुबोध भावे माझा भाऊ आहे) उशिराच आला. मग परत गप्पा झाल्या झोपायला नेहमी प्रमाणे १२ वाजलेच अंजलीला झोप येत नव्हती, टेन्शन आले होते, पण झोप लागली. सकाळी ५ वाजता उठून सर्व आवरून तयार झालो मंजिरीने एवढ्या सकाळी गरम पोहे केले होते खाऊन निघालो. सुबोध आला होता. पहिल्यांदाच इंटरनॅशनल एअरपोर्टला आलो होतो. धनूने वेबचेकिंग केले होते. सर्व प्रचलित सोपस्कार करून आत गेलो डोळे दिपून गेले विमानाला बराच वेळ होता वेळ तरी कसा घालवायचा. जरा वेळ एअरपोर्ट पहिला मग निवांत बसलो ९.३०ला एकदाचे विमानात बसलो एमिरात एअरलाईनने प्रवास आतील एकंदर रूप पाहता वेगळेपण जाणवत होते. एअरहोस्ट्रेस व्यवस्थित पेहराव बरोबर १०.१०ला विमान धावपट्टीवर आले पाहतो तर काय २/४ विमाने लायनीत उड्डाणासाठी थांबली होती. आमचा नंबर आला. आमच्या शेजारी एक महिला होती. कायम विमान प्रवास करत असल्याने तिने काही कानमंत्र दिले. काही वेळातच विमानाने हवेत झेप घेतली. प्रवास फक्त जेमतेम २-३० तासाचा होता विमानात वेलकम ड्रिंक (लिंबू सरबत) आले जेवण झाल्यावर जरा टीव्ही पाहत बसलो. पाहता पाहता विमान ४२ हजार फुटावर कधी गेले हे कळलेच नाही. सरतेशेवटी आम्ही दुबईच्या एअरपोर्टला पोचलो. एसटीप्रमाणे उतरण्याची घाई चालू होती, आम्हाला वैमानिकचे दालन पाहायला मिळाले ६ फूट उंच गोरापान बेल्जियमचा वैमानिक आम्हाला आत बोलावत होता सहसा कॉकपीट पाहता येत नाही पण आम्ही पहिले फोटो काढा म्हणाला. सर्व सोपस्कार करून आम्ही आगमन कक्षात आलो सचिनने आम्हाला बाहेर कसे पडायचे सांगितले होते. तो समोरच उभा होता जीवातजीव आला. त्याचे गाडीने घरी गेलो जाताना रस्त्यातील स्वच्छता अप्रतिमच, मोठे रस्ते, आलिशान वेगवेगळ्या आकारात उंच इमारती पाहून थक्क झालो. घरी आल्यावर जेवण करून जरा आराम केला सचिनचे घर खूपच प्रशस्त तसेच मस्त सजवले आहे.

सचिन (मनखूल भागात राहतो) ने दुबई सफारीचा संपूर्ण आराखडा आम्हाला दाखवला आम्हाला दुबईचे चलन दिरःमच्या नोटा दिल्या (भारतीय चालनात एक दिरःम म्हणजे १६.५०) मग आम्ही ग्लोबल व्हिलेज या जागेला भेट दिली तेथे सर्च देशाचे स्टॉल्स होते हिंदुस्थानी पण होता, एका स्टॉलवर एक काडीला बटाट्याचे पातळ वेफर्स भाजून देत होते. काही अरबी शाकाहारी पदार्थ चाखून पाहिले अंजलीने अरबी शोर्बा खाल्ला. जवळपास ४ तास पाहिल्यावर रात्री ८ पर्यंत घरी आलो. घरी आल्यावर दिवसभर काही काही खाल्ले म्हणून फक्त ताक पिऊन झोपलो पहिला दिवस संपला. सकाळी वेळेत उठून नास्ता करून (सचिन नेच पोहे बनवले होते) बाहेर पडलो एका बाजूला उंच इमारती आणि दुसऱ्या बाजूला स्वच्छ समुद्र किनारा निळसर पाणी दिसत होते. समुद्र किनाऱ्यावरील हॉटेल आलं बुरुज पहिले, पाम ट्री परिसर पहिला गृह बांधणीचा

उत्कृष्ट नमुना होता, तसेच दुबईचे शेवटचे टोक अटलांटिस रिसॉर्ट पहिले, नंतर एक मत्स्यालय बघालया गेलो एका गुहेच्या आकारात ते बनवले होते. वाटेत जाताना एका अरेबिक मॉल पहिला सर्वच आरबी वेशात होते. मत्स्यालय पाहिल्यावर आईस्क्रीम खाल्ले आपल्या आवडीचे आईस्क्रीम मध्ये हवा तो सुकामेवा तसेच काही फळे एकत्र करून हवेत उंच उडवून कप मध्ये झेलत होते. मग घरी येऊन जेवण केले सचिनने गाजराची कोशिंबीर त्याचे कुकने जेवण तयार केले होते. थोडी विश्रांती घेतली. ४ नंतर मिरॅकल गार्डन बघायला गेलो फुलांची अप्रतिम सजावट बघायला मिळाली. पुढे एक मोठा मॉल त्याचे नाव मॉल ऑफ एमिरातस् ३ मजली भव्य इमारत तेथे बर्फावरती स्कीईंग खेळत होते लहान मुले बागडत होती, वाळवंटात बर्फ हे एका आश्चर्यच, रोपे वे होते. काय नव्हते ते सांगा. रात्री बर दुबई पाहिली दस्तूर खुद्द बर गावात खाडी पण स्वच्छ त्यात एक भले मोठे जहाज उभे होते. क्रूझवर विद्युत रोषणाई केली होती, जुनी अरबी वसाहत पहिली, एका बोगद्याखालून गेलो वरून खाडी होती. दुबईचा सराफ बाजार म्हणजे गोल्ड सुख सोने, चांदी, प्लॅटिनमचे दागिने पाहावयास मिळाले. एक लेडीज टॉप चक्क सोन्याचं बनवला होता. नंतर मनखूल भागात कामत यांचे हॉटेल होते तेथे मस्त पैकी कांदा उत्तपा बिशीबेळी राईस आणि छान कॉफी घेऊन घरी आलो. आमच्या बरोबर स्वतः सचिन आपली कार घेऊन सर्व काही आपुलकीने दाखवत होता न दमता, नकंटाळता खरंच मानले पाहिजे.

सकाळी उठून सर्वकाही आवरून आज नाश्त्याला म्यूसली खाल्ले नंतर एमिरात्चे हेड ऑफिस पहावयास गेलो जाताना मेट्रोने गेलो ती त्या ऑफिस मध्येच जाते ऑफिस पहिले. ऑफिसच्या टेरेस मध्ये उभे होतो, समोरच एअरपोर्ट होता दर एक मिनिटाला विमान हवेत जात होते किंवा उतरत होते. एका तास कसा गेला ते कळलंच नाही जवळपास सर्व देशाची विमाने पाहायला मिळाली. तेथे नवं शिक्षित केबिन क्रू होते ते पाहताच अथर्वची आठवण झाली त्यांनी आमचा एका फोटो काढला. एमिरेट्सचे एक सोव्हिनियर शॉप आहे तेथून एक मॉडेल विमान सचिनने धनूला भेट दिले, मला एमिरेट्सचीं एक कॅप भेट दिली, नंतर ईकीय फर्निचर मॉलला भेट दिली अतिशय देखणी मांडणी, सर्व उपयुक्त फर्निचर उपलब्ध होते ३ माजली इमारत फिरता दमछाक झाली. काही चॉकलेट्स घेतली नंतर घरी आलो जर जेवलो जरा विश्रांती घेतली ४ वाजता डेझर्ट सफारीला निघालो तेथे एक पाकिस्तानी वाहन चालक होता बरेच वर्ष तो हे काम करतोय. डेझर्ट सफारी लक्षात राहण्याजोगी होती वेडीवाकडी वळणे, उंच सखल जाणे हा प्रकार सर्वसाधारण एका तास चालू होता मग एका अरबी हॉटेल वर आणून सोडले. तेथे एक तंबूच होता उंटाची फेरी, वाळवंटातील छोट्या गाड्या, फाल्कन पक्षी आपल्या हातावर डोक्यावर घेऊन फोटो काढले, अरबी वेशात फोटो काढला अंजलीने टिकली काढली नाही म्हणून ती ओळखून येत होती माझी दाढी असल्यामुळे मी अरबी वाटत होतो. तेथेच जेवण झाले फार काही विशेष नव्हते चिकन रोस्टेड होते ते तिने खाल्ले, मी शाकाहारी खाल्ले, घरी ९ नंतर पोहचलो, सचिनने दही भात तयार करून ठेवला होता मी थोडा खाल्ला तिने ताक घेतले. एकंदर गप्पा झाल्या एक चांगले आहे कि येथे फसवाफसवी दिसली नाही आम्ही अनोळखी होतो तरी. एकंदरीत शिस्त वाखाणण्याजोगी होती. ४ दिवसात कोठे पोलीस सुद्धा दिसला नाही.

सकाळी उठून सर्व आवरून सचिनने नास्ता म्हणून छान उप्पीट केले होते. ते खाल्ले दुबईचे म्युझियम बघायला गेलो ते तळघरात अतिशय सुंदर कल्पकतेने त्यात संपूर्ण दुबईचा कायापालट कसा झाला हे जिवंत वाटावा म्हणून स्पीकरवर गोष्ट आणि मुर्त्या फारच छान आहेत येथे वेळ फारच कमी मिळाला. तेथून काही भेट वस्तू घेतल्या माझ्या मेहुण्याला डोक्याची अरबी काळी रिंग व रुमाल हवा होता तो घेतला. नंतर घरी आलो जेवण करून जरा विश्रांती घेतली ज्या साठी दुबई प्रसिद्ध आहे ते म्हणजे बुर्ज खलिफा तेथे ६ वाजताचे आगाऊ बुकींग धनूनी आगोदरच केले होते. तेथे सचिन गाडी घेऊन सोडायला आला होता पार्किंग नाही म्हणून आम्हाला एका जागी सोडून सायंकाळी कोठे येणार ते सांगितले. सरते शेवटी बुर्ज खलिफाच्या १२५ व्या मजल्यावर जायला फक्त ५ मिनिटे लागली. काय ते विहंगम दृश्य होते, पाहता पाहता सायंकाळ झाली सूर्यास्त पहिला फोटो काढले अंधार झाल्या बरोबर खाली संगीतमय कारंजी हवेत झेपावली नयन मनोहर दृश्य त्यात विद्युत रोषणाई झळकत होती असे करत असेपर्यंत साधारण ८.३० वाजले जरा धाकधूक होती आपला आणि सचिनचा संपर्क कसा होणार इतक्यात एका जण म्हणाले कोणाची वाट पाहताय काय त्यांनीच सचिनला फोन केला जीव भांड्यात पडला. सचिन भेटला आम्ही दुबईचा सुप्रसिद्ध दुबई मॉल पहिला तेथे एक प्रचंड मोठे मत्स्यालय आहे हे एका काचेच्या गुहेत बनवले आहे. ते पाहून झाल्यावर आम्ही एका मॉल मध्ये गेलो तेथे सर्व प्रकारचे स्टॉल्स होते पाणीपुरी भेळ डोसा असे सर्व भारतीय पदार्थ होते, ते मनसोक्त खाल्यावर एक ७ डी सिनेमा पहिला रात्री घरी येऊन छान झोप झाली सकाळी उठून सर्व आवरून नास्ता केला आज सचिन कामाला गेला होता त्याने किलॉग्स ठेवले होते ते खाल्लं बरोबर १० वाजता एका गाडी आली आणि अबुधाबी सफारीला

घेऊन गेली जवळपास १२० किलोमीटर अंतर फक्त एका तासात पोचलो अबुधाबीचा बराचसा भाग दाखवला, एक मोठी मस्जिद पहिली अप्रतिम कलाकुसर देखणे बांधकाम पण तेथे महिलांना बुरखाच घालावा लागतो. नंतर अबुधाबीच्या राज्याचा राजवाडा फक्त बाहेरूनच पाहता येतो. एमिरात राजवाडा पहिला उद्या व्हॅलंटाईनडे असल्यामुळे एक लाल गुलाब आणि मधे मोठा बदाम केला होता तेथे फोटो काढले आणि २ वाजता जेवायला मॉल वर सोडले मी शाकाहारी माझी आली पंचाईत काही खाण्यासाठी दिसत नव्हते एका सलाड बास्केट आणि पिझ्झा घेतला वेळ निभावली दुबईला येताना खूप वाहतूक लागली म्हणून वेळ लागला सचिन वाट पाहतच होता येथे इजिप्तचा थीम वर वाफी शो असतो ते पहिला फारच छान होता तेथे आशा भोसले यांचे एका हॉटेल आहे.आतापर्यंत ६ दिवस कसे गेले कळलेच नाही सचिनच्या घरा जवळ ज्योती रहाते तिच्या कडे सुध्या फक्त ३० मिनिटेच गेलो योगायोग म्हणजे तेथे माझा शाळा मित्र पेठे भेटला पुण्यात नाही भेट होत दुबईला भेट झाली. आज शेवटचा दिवस सायंकाळी ६ वाजेपर्यंत एअरपोर्टला जाणे आवश्यक होते. सचिन आज लवकरच कामाला गेला होता. आज काही किरकोळ खरेदी होती त्या मुळे सचिन चा भाऊ नितीनची बायको निमीषा आली होती तिच्या बरोबर खरेदी केली वॅलेंटाईनडे आणि ते सुद्धा दुबईत मग अंजलीला एका पर्स घेतली आता आरबी मिठाई घेणे बाकी होते ती एअरपोर्टला सचिन घेऊन देणार होता सचिन चीं बायको पुण्याला असते पण त्यांनी घरात बाईमाणूस नाही असे कोठेही जाणवू दिले नाही दुबई चा जास्तीत जास्त भाग मनापासून कोणताही कंटाळा न करता आमची सर्व चोख व्यवस्था ठेवली होती.

शेवटी रात्री १०.२० वाजता एमिरात एअरलाईन्सच्या डबल डेकरने परतीचा प्रवास चालू झाला रात्री २.३० वाजता मुंबई एअरपोर्टला उतरलो कस्तुरीनी केके ट्रॅव्हल्सचीं गाडी आगाऊ ठरवली होती पहाटे ४ वाजता सुखरूप घरी पोचलो असा झाला आमचा पहिला वाहिला विमान प्रवास यात खरे तर धनश्री व कस्तुरी यांनी सर्व एअर टिकेट्स, व्हिसा, चलन, विमा, या सर्व बाबतची चोख नियोजन केले होते. तसेच सुबोध मंजिरी मयुरेश यांनी आमच्या वरील प्रेमा मुळे खुपच मदत केली, विशेषतः सचिनला खरोखरच मनापासून धान्यवाद त्यांनी सर्व बाबीत बहुमूल्य सहकार्य केले. सर्व प्रवास वर्णन सौ. अंजली न विसरता दररोज रात्री टिपून ठेवत होती. ♦

**खालील कवितेत २६ वेळा पाणी शब्द आला आहे व वैशिष्ट्य असे, की प्रत्येक वेळी पाणी या शब्दाचे विविध अर्थ उलगडतात..! ही आहे मराठी भाषेची श्रीमंती..! 'पाणी' शब्द हा असे प्रवाही, वळवू तिकडे वळतो हा.. जशी भावना मनात असते, रूप बदलते कसे पहा..!**

## रंग पाण्याचे

नयनामध्ये येता 'पाणी'
अश्रू तयाला म्हणती,
कधी सुखाचे, कधी दुःखाचे,
अशी तयांची महती..!

चटकदार तो पदार्थ दिसता,
तोंडाला या 'पाणी' सुटते,
खाता खाता ठसका लागून
डोळ्यांतून मग 'पाणी' येते..!

धनाढ्याघरी लक्ष्मी देवी,
म्हणती अविरत भरते 'पाणी'..
ताकदीहूनी वित्त खर्चिता
डोक्यावरूनी जाते 'पाणी'..!

वळणाचे 'पाणी' वळणावरती
म्हण मराठी एक असे,
बारा गांवचे 'पाणी' प्यायलाय
चतुराई यातुनी दिसे..!

लाथ मारूनी 'पाणी' काढणे,
लक्षण हे तर कर्तृत्वाचे,
मेहनतीवर 'पाणी' पडणे
चीज न होणे कष्टाचे..!

उत्कर्ष दुज्याचा मनी डाचतो,
'पाण्या'त पाहणे गुण खोटा..
'पाणी'दार ते नेत्र सांगती,
विद्वत्तेचा गुण मोठा..!

शिवरायांनी कितीक वेळा,
शत्रूला त्या 'पाणी' पाजले..
नामोहरम करून, अपुले
मराठमोळे 'पाणी' दाविले..!

टपोर मोती दवबिंदूचे
चमचम 'पाणी' पानावरती,
क्षणैक सुखाची प्राप्ती म्हणजे,
अळवावरचे अलगद 'पाणी'..!

कळी कोवळी कुणी कुस्करी,
काळजाचे त्या 'पाणी' होते..
ओंजळीतूनी 'पाणी' सुटता,
कन्यादानाचे पुण्य लाभते..!

मायबाप हे आम्हां घडविती,
रक्ताचे ते 'पाणी' करूनी..
विनम्र होऊन त्यांच्या ठायी
नकळत दोन्ही जुळती 'पाणि'

आभाळातून पडता 'पाणी'
तुडुंब, दुथडी नद्या वाहती,
दुष्काळाचे सावट पडतां
सारे 'पाणी पाणी' करती..!

अंतीम समयी मुखात 'पाणी'
वेळ जाणवे निघण्याची..
पितरांना मग 'पाणी' देऊनी,
स्मृती जागते आप्तांची..!

मनामनांतील भावनांचे,
'पाण्या' मध्ये मिसळा रंग..
प्रतिबिंबीत हे होते जेव्हा,
चेहऱ्यावरती उठे तरंग..!! ♦

# सूर नवा, ध्यास नवा (एक आढावा : प्रयत्न : प्रवास)

• सौ. गायत्री ग. जोशी
भ्रमणध्वनी : ९८६९३३५५३६

'कलर्स मराठीचं' पुढचं. आणखी एक पडलं, दिमाखदार पाऊल। उद्घोषणेतून रसिकांना लागली, संगीत मैफलीची, गोड चाहूल।। कार्यक्रम आगळा-वेगळा, सूर नवा ध्यास नवा, छोटे सूरवीर। कधी एकदा येताहेत पडद्यावर, म्हणून प्रेक्षक झाले अधीर।। शेकडो लहानग्यांच्या सहभागातून, पारखून घेतले स्वरांचे हिरे। मूर्ती होत्या लहान, पण डोळ्यांत चमकती भाव, काहीसे गहिरे।। निवड फेरीची झलक पहातानाच, दिसला छोट्यांचा आत्मविश्वास। गाणी त्यांची आस्वादताना, प्रेक्षकांनीही धरला रोखून श्वास।। नमस्कार, नमस्कार, नमस्कार म्हणून स्पृहा जोशी स्वागत करते सर्वांचे। सुरांच्या या शाळेची, घंटा देण्याचं काम मात्र छोट्या हर्षद मॉनिटरचं।। किती सहज सुंदर अभिनय याचा आणि पाठांतर अफलातून। छोट्या प्रेक्षकांनाही, बरंच काही शिकता येईल याच्या कृतीतून।। 'झगमगत्या, सळसळत्या उत्साहाने भरलेल्या' या रंगतदार कार्यक्रमाची। मेजवानी मिळे रसिकांना, सोमवार-बुधवार प्रत्येक सप्ताहाची।। 'सूरसेना' टीम, अवधूत गुप्तेसरांची, 'सुरीली', शाल्मली खोलगडेची। 'सुराधीश' महेश काळे; परीक्षकांची भूमिका या तीन कॅप्टन्स्‌ची।। प्रारंभीची सारी गाणी ऐकताना, नावीन्य वाटते; रसिक प्रेक्षकांना। गायक मूर्ती आहेत लहान, जिंकून घेतले त्यांनी, सप्त स्वरांना।। प्रत्येक सप्ताहात, नवा आविष्कार, सादर होई स्वरबहार। वसंत फुलतो सदासर्वदा, गारवा आणती सूर गंधार।। वादकांची साऱ्याच, साथ आहे लाजबाब। भाव-भक्ती-न्याय्य गीतात, क्वचित येती सवाल-जवाब।। उपस्थितीने मान्यवरांच्या, निश्चितच वाढतो मैफलीचा रुबाब। मान सन्मानाने त्यांना, गाण्याबद्दलचे मत विचारताना, राखला जातो आब।। चिमुरडी अशी, 'सृष्टी' पगारे, वय अवघे सात, निरागस; तरी गाणे रसरशीत। ''कसं जमतं ग तुला हे सगळं?'' या प्रश्नाचं उत्तर साधं, ''मला नाही माहीत''।। 'साहिल पांढरे' विशेष स्पर्धक; काळजी असे त्याची सर्वांना। मदत करती मंचावर येता-जाताना, निर्लेप मनाचे दर्शन, हळवे क्षण जपण्या।। आदी गंधर्व, अंशिका, चैतन्य, मीरा, विश्वजा, नेहा, स्वराली। नागपूरहून आला, उत्कर्ष वानखेडे, आई-बाबा दूर, लाला आजोबांनी सांभाळले।। 'घागर घेऊन पाण्या निघाली' हे गाणे अभिषेकने खूप महारीने गायले। दहीहंडी केली, प्रतीकात्मक साजरी, गणपतीची मूर्ती-निर्मिती अन् स्थापनाही झाली या सूरांच्या मंचावरी।। छोट्यांनी मोठ्यांच्या साक्षीने, पताका उभारली, परंपरेची, संस्कारी। औचित्य साधून नवरात्रीचे, आयोजिले, साथ-संगत, महला वादकांचे।। देवी रूपाने दिली साथ, थक्क केले बोटांनी, सूर निघाले वाद्यांचे। काही गीतांना असते आवश्यक, कोरस चमूची, दमदार साथ। निरागस मैत्रीच्या साथरला, दाद देताना, रसिकाने म्हटले ''क्या बात!'' वादक सारेच, हसतमुख उत्साही, दखल घेतली त्यांची सर्वांनी। तबला, व्हॉयोलिन, की बोर्ड, बासरी, मेळ बसवला साऱ्यांचा, मेहेनतीनी।। विविध शाळांचे विद्यार्थी समूह, शिक्षक, पालक यांनी हजेरी लावली। कौतुक त्यांचे होते साऱ्यांना, अंतरीच्या खुशीने, डोलत राहिली।। 'महेश मांजरेकर', 'अशोक सराफ', उपस्थिती सहभाग, होता. छान। गायले-नाचले, बेधुंद होऊन, लहानांसंगे झाले तेही लहान।। 'आनंद शिंदे', 'सुमित राघवन', सर्वांचे लाडके, सचिन पिळगांवकर। अशा अनेकविध मान्यवरांनी, प्रेम केले या छोट्यांच्या सुरांवर।। मग 'लईभारी' पाहुणे आले, चित्रपट माऊलीच्या कथारूपांतून। कथाबीज उलगडताना, मनमनांचे भावबंध, देती समजावून।। नात्यांची घट्ट अशी वीण, बापलेक-मैत्र जिवांचे, भावनेच्या ओलाव्यातून। उत्तम परीक्षण आणि मार्गदर्शन, समजावती प्रेमाने, सारे परीक्षक। मोकळे-ढोकळे अवधूत सर, खेळकर शाल्मली ताई, महेशसर काहीसे चिकित्सक।। तरीही आहेत, सारे श्रेष्ठतम मान्यवर, अनुभव त्यांचे चिरंतर नक्की। आश्वस्त करून, प्रोत्साहन देतांना, सुरांची छोट्यांच्या ताकद वाढे पक्की।। मधेच एकदा, घेतली होती, महेश सरांनी छोटीशी 'विश्रांती'। त्यांची जागा, घेतली मग, गायक स्वप्नील बांदोडकरांनी।। छोट्या सूरवीरांबरोबर गाणे गाताना, जपली कौतुक भावना, मोठ्या मनानी। 'कमाल-चाबूक; तोडलंस-फोडलंस' ही उत्साही प्रतिक्रिया अवधूत सरांची। वरचा-खालचा सूर छान लागला, काही वेळा किंचित हलला, सूक्ष्मता दाखवून प्रेरणा, शाल्मली ताई 'तुझं गाणं खूप छान झालं', 'मला खूप आवडलं' असं प्रांजल, म्हणती महेशसर। सात्त्विक उपमा, ध्येय उदाहरणे, घडलेले सारे प्रसंग, सहज म्हणती।। पालकांचं महत्त्व, संस्कार परंपरांचं लेणं, त्यांचाही उल्लेख केला परीक्षकांनी। नकळत-कळत, काही संदेशही दिले, आपल्या मतांच्या अनुभवानी।। 'दरवर्षी

पाऊस पडला, तरी त्याचं आश्चर्य वाटावं' अशी तुमची गाणी आनंददायी। अशी सोपी–व्यावहारिक उदाहरणे देऊन, प्रशंसाही केली सूरवीरांना प्रेरणादायी।। 'स्पृहाताईची' 'मायाळू मिणे' 'दे टाळी'ची हसरी खुशी, 'मार्कस्' विचारूया? लाडिक सूर। या साऱ्या क्रिया–प्रतिक्रियांची असते गरज, मोकळेपणामुळे, दडपण होते दूर।। 'मेरिट', 'जिनियस' या श्रेणीमधले, बदलती सदा चढउतार। सूराविरांची शिडी, कधी चढून होई सरसर, तर कधी घेती किंचित माघार।। अशी ही खेळकर, गंमत–रंजक स्पर्धा, कालांतराने नियमात बांधली गेली। कुणाला मिळे, बहुमानाची 'सुवर्ण कट्यार' तर कुणी कुणा, रजा द्यावी लागली।। स्पर्धेतून वाद करणारा 'बुधवार' सर्वांनात वाटे काहीसा हळवा।। प्रेक्षक, स्पर्धक, परीक्षक, रसिक सर्वांनाचा येई दाटून उमाळा।। आशीर्वाद, शुभेच्छा, सांत्वना अन् भेटीचा 'कॉफीमग' घेऊन, बाद स्पर्धक निरोप। 'शो मस्ट गो ऑन', या उक्तीनुसार स्पर्धा मात्र पुढे जातच राही।। दर्जा आहेच उत्तम, सर्वार्थाने या मैफलीचा, कलेकलेने वाढणाऱ्या चंद्रासारखा। चिरंतन राहील, आठवणीत, मनी मानसींच्या, अत्तराच्या कुपीसारखा। माझ्या घरी आहेत, तीन गुणी नातवंडे माझी। तुम्हा नातवंडांनाही, शुभाशीर्वादाची भेट देते, ही गायत्री आजी।। आज माझा 'नातवंडांचा परिवार' वाढला, आजीही धन्य झाली, उदंड यश कीर्ती लाभो तुम्हाला आणि सुरांना, ही देवाकडे प्रार्थना मी केली।। 'शुभंभवतु'

♦

---

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२०

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस व तद्जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी **'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा'** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची कमाल दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **भाग घेण्यासाठी पात्रता :** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व चित्पावन कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@maratrhepratishthan.org या इमेल आयडी वर केवळ '.jpg' format मधील कमाल 2 फाईलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. 22 ऑगस्ट 2020 ते दि. 30 सप्टेंबर 2020.
- छायाचित्राच्या caption मध्ये प्रेषकाचे नाव किंवा शहर यांचा उल्लेख नसावा. प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डींग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

**या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके:**

**प्रथम पारितोषिक : रु.1001/–** **द्वितीय पारितोषिक : रु. 751/–** **तृतीय पारितोषिक : रु. 501/–**

**20 पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास 2 उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील.**

**टीप:** १. मराठे प्रतिष्ठानच्या **'कार्यकारिणी सदस्यांना'** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.

३. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा. ई–मेल: hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७

# माझी फॉरेनची मुशाफिरी

• श्री. उल्हास मराठे, सुरेंद्रनगर, गुजरात भ्रमणध्वनी : ९८२५२२३७३८

**स**काळचे ७.४५ वाजले होते. मी कंपनीत पोहोचलो, तेव्हा लेले साहेब एकटेच त्यांच्या केबिनमध्ये बसले होते. अजून बाकी स्टाफ मेंबर यायचे होते. साहेबांनी मला केबिनमध्ये बोलावले. अचानक एक अनपेक्षित प्रश्न विचारला. ''तुमचा पुढील पाच वर्षाचा प्लॅन काय आहे?'' मला हा प्रश्न अनपेक्षित होता. मी अतिशय सावधतेने उत्तर दिले ''काही नाही आता माझी मुलगी एक महिन्याची आहे, त्यामुळे कुठे बाहेरगावी जाण्याचा प्रश्न येत नाही.''

जरा खालच्या आवाजात मी उत्तर दिले. नंतर लेले साहेब म्हणाले, ''एन.आर.बी. तुम्हाला ट्रेनिंगसाठी फ्रांसला धाडायचा विचार करत आहे. पण मला एक खात्री द्या कि तुम्ही छोटया-मोठया कारणासाठी निदान पाच वर्षे तरी कंपनी सोडणार नाही. असेही कंपनी तुमच्याकडून बाँड घेईलच पण नैतिक बाँड फार चांगला''.

थोडा वेळ मला खरेच वाटेना. मला डिझाईनला येऊन आताच ६ महिने होत आहेत आणि डिझाईनच्या ट्रेनिंगसाठी माझी निवड झाली ? त्याला कारणपण तसेच होते. थोडयाच दिवसापूर्वी श्री चलम, हे फ्रांसहून परत येऊन कंपनी सोडून गेले होते. त्यांनी स्वत:ची कंपनी सुरु केली होते. त्यासाठी एन.आर.बी.ला विश्वासू माणूस हवा होता. आपण परत बोलू म्हणून साहेबांनी भाषण पूर्ण केले.

रात्री मी सौ. वीणाला फोन करून ही बातमी सांगितली. तिला खूप आनंद झाला म्हणाली ''हा दीपाचा पायगुण'' आणि थोड्या काळजीच्या स्वरातच होकार दिला. आई, वरती रहाणारी मावशी अशा राबत्या घरात असल्याने घरची काळजी नव्हती. मी थोडा विचार करुन आई व तात्यांशी म्हणजेच आजोबाशी बोलून मग होकार दिला. मराठे कुटूंबात मीच पहिला परदेशी जाणारा, कदाचित विमानाने एवढ्या दूर जाणारा मीच पहिला. शिक्षणाच्या बाबतीत मराठे पुरुष मंडळी फार महत्त्व देत नव्हते. पण मराठ्यांच्या बऱ्याच सुना चांगल्या शिकलेल्या होत्या.

तात्यांना विचारायचे खास कारण की, मागे शाळेची ट्रीप पुण्याला विमानाने जाणार होती. तेव्हा तात्यांनी मला परवानगी दिली नव्हती. मी एकुलता एक मुलगा त्यामुळे त्यांची परवानगी नव्हती. पण आता सर्वांच्या परवानग्या घेऊन मी साहेबांना होकार दिला. मग चक्र जोरात फिरू लागली. एक महिन्यात म्हणजे नोव्हेबरला जावे लागणार होते. त्यामुळे गरम कपडे व बाकी सामान यांची जुळवाजुळव व कंपनीत कामाची व तिथे घ्यायच्या ट्रेनिंगची जुळवाजुळव सुरू झाली. त्याच सुमारास श्री अरोरा फ्रांसहून परत आले. ते निडल बुशच्या ट्रेनिंगला गेले होते. त्याचा पाठोपाठ रिपोर्ट आला की त्यांना अजिबात फ्रेंच भाषा येत नव्हती. म्हणून मी फ्रेंचचे ट्रेनिंग घेऊनच जावे असा विचार झाला. एक महिन्यात ते शक्य नव्हते. त्यामुळे माझे जाणे पुढील वर्षी म्हणजे सन १९७६ वर गेले. तिथली थंडी मार्चपर्यत असते त्यामुळे माझे जाणे मार्च १९७६ पर्यंत लांबले. रोज फ्रेंच भाषेची शिकवणी शिवाय एक प्रायव्हेट ट्युशनपण लावली होती. त्या बाई ताज हॉटेलमध्ये कायमच्या रहात होत्या. फेंच अँबॅसिडरची पत्नी होत्या त्या. त्यामुळे मला घरी यायला १०.३० वाजायचे. परत सकाळी ८ वाजता कामावर हजर. त्यात लेले साहेबांचे कामाच्या बाबतीतील शिकवणे चालूच होते. पुढे एप्रिलमध्ये श्री क्रोमबॅक इंडियाला आणि इतर देशात गेल्यामुळे माझे जाणे आणखीनच पुढे गेले. ऑगस्ट मध्ये सामुहिक सुट्टी असल्याने आणखीनच लांबत जात होते. शेवटी जूनमध्ये जाण्याचे नक्की झाले. आता दीपा नऊ महिन्याची झाली होती व माणसांना चांगलेच ओळखू लागली होती.

गुरवारी सकाळी एअर इंडियाची डायरेक्ट फलाईट पॅरीससाठी होती. सगळी तयारी करताना पु.लं.च्या अपूर्वाची आठवण झाली. जास्त पैसे जवळ नसणार होते. सर्व व्यवस्था नाडेला कंपनी करणार होती. पण पैसे आपल्यालाच चुकवायचे होते. १५००० फ्रँकस ( सुमारे रु.३०,०००/-) मला तिथे मिळणार होते. प्रवासासाठी २५० फ्रॅक्स मिळाले होते.

सकाळी १०.३०च्या सुमारास विमान उडणार होते. मराठे परिवारातून सुमारे २५-३० लोकं मला विमानतळावर सोडायला आले होते. मला भैया लोकांची आठवण झाली. एकाला सोडायला १०-१२ जण असायचेच. त्यावेळीस मुंबईचे विमानतळ फार लहान होते. डाव्या बाजूला इंटरनॅशनल व उजव्या बाजूला नॅशनल. सर्व सोपस्कार झाल्यावर विमानात स्थानापन्न झालो व विमान उडाले. ३.३० तासांचा फरक व ८ तासांचा प्रवास, असे असूनही मी दुपारी चार वाजता पॅरीसला

पोचलो. Sortirच्या पाटया पहात इमिग्रेशननंतर बाहेर पोचलो.

क्षणभर भांबावलो होतो. मी कोणालाच ओळखत नव्हतो. पण माझा फोटो आधीच नाडेला कंपनीत धाडलेला असल्याने श्री फुमाऊ आले असणार होते. पाच मिनिटात माझ्याच वयाचा उंचापुरा फेंच तरुण माझा फोटो हाता घेऊन हळू आवाजात माझया कानात बोलला बोझू, मी. मराठे?, मी परत ‘‘बोझू म्हणून उत्तर दिले.

क्षणभरातच ओळख पटली व मी माझ्या दोन बॅगा घेऊन त्याच्या मागे चालू लागलो. माझी अडचण समजून तो माझी मोठी बॅग सहजरित्या उचलून चालू लागला.

गुरुवार दुपार असल्याने रस्ते शांत वाटले. एकंदरीत पॅरिसचे पहिलेच दर्शन फारच अल्हाददायक वाटले. सर्वच बाबतीत विचार करता आपण साधारणपणे १०० वर्षे मागे आहोत असे वाटले. प्राथमिक विचारपूस करुन मला हॉटेलवर सात दिवसासाठी खोली मिळाली. हॉटेलच्या समोरच ब्रिटिश कॅफे हॉटेल. शुक्रवार, शनिवार आणि रविवार आराम होता. सोमवारी मला न्यायला श्री फुमाऊ परत येणार होते. आता सोडेतीन दिवस काय करणार? हॉटेलपासून चालत अंतरावर मेट्रो स्टेशन होते. श्री फमाऊंनी मला रेल्वे तिकिट ऑपरेशन समजावले व तो निघुन गेला. जवळ जवळ ९० तास काढायचे होते. प्रथम अंधोळ करुन, घरुन आणलेले थोडे फार खाऊन झोपलो. जागा झालो तर चांगचाल उजेड होता. घडयाळात पाहिले तर ८.३० वाजले होते. काही कळेना, दुस–या दिवशीचे सकाळचे ८.३० तर वाजून गेले नाहीत ना? कपडे घालून खाली गेलो व काऊंटरवर विचारले किती वाजले तर त्यांनीही ८.३०च सांगितले. माझ्या चेहे–यावरील भाव पाहून त्यांनी ओळखले व म्हणला, It is almost longest day, sunset will be at 10 p.m. and light will be up to 11-30 night. त्यानंतर मला जरा शांत वाटले. त्याच्याकडून पॅरीसचा मॅप घेतला व एक तासभर रस्त्याने सरळ जाऊन परत आलो. रस्त्यात मला नाडेला कंपनी लागली. झोप येत नव्हती तरी पडून राहीलो. केव्हातरी झोप लागली व पहाटे पाचलाच जाग आली. सामान आवरुन अंघोळ करुन एका बगलपिशवीत थोडे खायचे समान घेऊन परत फिरायला निघालो. कसेबसे ३ दिवस संपले. व सोमवारी सकाळी श्री फुमाऊ मला नेण्यास आला. फॅक्टरी चालत जाण्याच्या अंतरावरच होती. त्यानेच सर्वांशी ओळख करुन दिली. त्याचे बॉस श्री क्रोमबॅक एखादा ब्रिटिश हिरो शोभतील असे होते. दोघेही छान इंग्लीश बोलत होते त्यामुळे खूपच सोपे वाटले. क्रोमबॅकच्या छोटया ऑफिसचा स्टाफ इंग्लिश बोलत होता.

दुपारच्या जेवणानंतर मला डिझाईन डिपार्टमेंटमध्ये घेऊन गेले. बंहम कमेपहद चें फंडामेंटल तिथल्या हेडने समजावले. आतापर्यत असलेल्या केजचा मी स्टडी केला होता. त्यातील काहीबाबत मी चर्चा केली, माझा स्टडी पाहून ते खूपच इंप्रेस वाटले. तिथल्या सर्वांशीच फ्रेंच बोलावे लागत होते. ते लोक केज डिझाईन ग्राफिकली करत होते. मी आधीच सर्व मॅथॅमेटिकली, ट्रिग्नॉमॅटिकली, कॅलक्युलेट केले होते. प्रथम ते समजून घ्यायलाच तयार नव्हते, मग मी त्यांना दोन त्यांचीच केलेल्या ग्राफिकचे कॅलक्युलेशन करुन दाखविले. मग त्यांनी बाकी सर्वांना बोलावून माझी थिअरी समजावयला सांगितली. प्रथम सर्वांना जरा कठीण वाटले पण दुसऱ्याच क्षणाला सर्वांना खूप आवडले. त्यावेळी कॅलक्युलेटर नवीनच आला होता. पण अजून सायंटिफीक कॅलक्युलेटर नव्हता त्यामुळे टॅन, साईन, कॉस्ट टेबलवर पाहून करायला लागायचे. तरीसुध्दा ही मेथड चांगली वाटली. व पहिल्याच दिवशी मी हिरो ठरलो. गेल्या तीन महिन्यात केलेल्या श्रमाचे सार्थक झाले. तेव्हाच समजले आपली आय. क्यू. लेव्हल खूपच चांगली आहे. त्यांचे कॅलक्युलेटरशिवाय चालतच नाही. या मेथड नी ट्राय आणि एररच्या ऐवजी डायरेक्ट रिझल्ट मिळतो. त्यानंरही अनेकवेळा याचा प्रत्यय आला. मी खूपच कंफर्टेबल झालो. याचे बरेचसे श्रेय श्री लेले साहेबांना जाते.

आणखीन दोन तीन दिवसांनी त्यांच्या एच. आर. खात्यात मला बोलावले व मी भाड्याने घेण्यासाठी जागा पहायला गेलो. पहिली पाहिलेली जागा चांगली होती. पण भाडे खूपच जास्त वाटले. माझे निम्मे पैसे भाडयातच गेले असते. दुसरी थोडी लहान होती पण त्याला बाथरुम नव्हती. वनरुम व लहानसे किचन एका माणसासाठी खूपच छान होते, पण अंधोळीचे काय? त्या घरापासून ते फॅक्टरीच्या मध्यल्याभागात एक इंडोअर तरण तलाव होता. अतिशय कमी दरात तीन महिन्याचा पास काढला व सर्व गोष्टी सेट झाल्या. तलावात हॉट वॉटर आणि वॉर्म वॉटरचे दोन टँक होते. उन्हाळा असल्याने वॉर्मच चांगले होते. सर्वात मोठी काळजी होती जेवण खाण्याची. सकाळी कारखान्यात पाच फ्रॅंकला पाच वस्तु घेता यायच्या. शिवाय मला भात आवडतो म्हणून मला भात तुपावर परतून द्यायचे. चहा कॉफीचे मशिन होते. संध्याकाळी घरीच करायचो कधी ब्रेडचा सांजा, सॅडीवीच कॉफी, मुगाच्या डाळीची खिचडी, तेल तुपाशिवाय, तर कधी कांदा बटाटा रस्सा व ब्रेड.

एकंदर चांगले व स्वतात जमले होते. बाहेर जाऊन जेवणे शक्यच नव्हते. एतवालला इंडियन रेस्टॉरंट होते पण फारच महाग. त्यावेळेला एक प्लेट भजी २५ फ्रँकला म्हणजे ५० रुपयांना होती. तेव्हा बाहेर जेवण कल्पनेतच होते. दिवसेंदिवस

काम वाढत चालले होते. बरेचवेळेला शनिवारीपण कामावर जात होतो. शक्यतोवर लवकर काम संपवायचे होते व नंतर आठ दिवस तरी युरोप फिरायला जायचा विचार होता. जेव्हा कामावर जात नसे तेव्हा सकाळीच बाहेर पडून पॅरीसचे वेगवेगळा भाग शक्यतो पायी फिरुन पहात होतो. दोन तीन महिन्यात जवळ जवळ सर्व पॅरीस दोनदा पाहून झाले होते. असाच एका शनिवारी सकाळीच मेट्रोने जाऊन एअर इंडियाचे ऑफिस उघडण्याची वाट पहात, ऑपेरा हाउसच्या पायऱ्यांवर बसलो होतो. एअर इंडियाच्या ऑफिसमध्ये ऑफिसर होत्या शंकर्स बिकलच्या, शंकर ची कन्या. नेहमी मी जात असल्यामुळे त्या मला चांगल्या ओळखत होत्या.

पायरीच्या बाजूलाच अनेक ट्रॅव्हेल एजंटांची छोटी दुकाने होती व ते वन डे टूर्स ची तिकीटे विकत होते. एक गुजराथी कुटुंब, साधारण ८-१० लोक त्या दुकानात हुज्जत घालत होते. पण त्यांना काही जमत नव्हते. त्यातल्याच एकाने माझ्यापाशी येऊन हिंदित गोष्ट केली. (प्रथम गुजराथीत) तुम्हाला फेंच समजते का? मी थोडे थोडे समजते म्हणताच तो खुष झााला. मला घेऊन तो दुकानात गेला. त्या मंडळीना एकाच दिवसात आयफेल टॉवर व लोनेर म्युझियम पहायचे होते व रात्रीच्या गाडीने लंडनला जायचे होते. त्यांनी ८५ फ्रँकची बसची तिकिटे काढली होती. परंतू ती बस सर्वच गोष्टी बाहेरुन दाखवणार होती. टॉवरवर जाणे शक्य नव्हते व म्युझियम वर त्यांना १५ मिनिटांचा वेळ दिला होता त्यामुळे ते पण शक्य नव्हते. मग मी त्या एजंटला समजावले अरे या लोकांना जे हवे आहे ते तुम्ही दाखवणार नाही व त्यांन पॅरीसमध्ये येऊन आयफेल टॉवर न पहाताच परत जावे लागेल असे पटवल्यावर त्यांनी शेवटी ५ फ्रॅंक कापून बाकी पैसे परत केले. आता पुढे काय? मी समजावले कसे कसे कराल पण त्यांना काही जमेलसे वाटत नव्हते. शेवटी त्यानी मलाच बरोबर घेऊन जाण्याची इच्छा दर्शविली. मलापण विशेष काही काम नसल्यामुळे मीपण तयार झालो. प्रथम त्या सर्वाची वन डे मेट्रोची तिकिटे काढली. ऑपेरा वरुन ट्रेकेडोटवर उतरलो. पायऱ्या चढत असतानाच समोर टॉवरचे दर्शन होते व मन प्रसन्न होते. जगातले एक आश्चर्य डोळ्यापुढे होते. चालत चालत टॉवरच्या खाली पोहोचलो. सर्वाची १० फ्रॅंकची तिकिटे काढली व मी खालीच थांबलो. त्यांचा खूप आग्रह चालला होता पण आतापर्यंत मी दोनदा वर जाऊन आलो होतो. त्यांचे म्हणणे होते तुम्ही एकटेच खाली काय करणार? मी जरा लाजतच सांगितले मला थोडे खाऊन घ्यायचे आहे. माझी वेळ झाली आहे. ताबडतोब त्यांच्या बरोबरच्या बायकांनी खाण्याचे डवे काढले शेव, पुऱ्या, बटाटयाची भाजी, सुखाडी वैगेरे एका डिशमध्ये भरुन माझ्या हातात दिले. मी काहीपण आढेवेढे न घेता ते स्वीकारले. कारण सुमारे दोन महिन्यात इंडियन फुड खाल्ले नव्हते. घरुन आणलेले १० दिवसातच संपले होते. ती मंडळी वर जाऊन येईपर्यत मी आराम केला. सुमारे तासाभराने मंडळी खुष होऊन समाधानाने खाली आले. मला खूप खूप धन्यवाद देत होते. नंतर परत मेट्रो पकडून लोअरला गेलो त्यांना मोनालिसा शिवाय काहीच पहायचे नव्हते. ते पाहून समोरच्या बागेतून कॉंकार्टपर्यंत चालत गेलो. तेव्हा तिथे मोठे जिलोटिन ठेवले होते. नंतर जवळचे चर्च दाखवले व साईटवरुन सर्व पुल दाखवून रात्री ९ वाजता त्यांना रेल्वे स्टेशनवर सोडले. मंडळी खूपच खुष झाली आम्ही आपापले पत्ते दिले. त्यातल्या काही लोकांचे लंडनला दुकान होते व काही आफ्रिकेहून आले होते. मी लंडनला आल्यास त्यांच्याच घरी उतरण्याचा आग्रह केला व मी त्यांची रजा घेऊन घरी परत आलो. एकंदर दिवस खूप चांगला गेला होता.

हळूहळू कामं आटपत आणत होतो. येत्या शनिवारी श्री फुमाऊ बरोबर त्याच्या नेटिव्हला जायचे होते. त्याचे गाव पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर होते. छान बीच, खास त्या समुद्रात रेतीच्या मोठ्या कमानी होत्या बीच फारच फेमस आहे. आम्ही शुक्रवारी संध्याकाळी फॅक्टरीतून डायरेक्ट निघालो व साधारण तीन तासांनी त्याच्या घरी पोचलो. तिथे त्याचे आई वडील, त्याची चुलत बहीण तिच्या दोन छोट्यांसह आली होती. जुन्या पद्धतीचे मोठे घर होते. येताना वाटेतच जेऊन आल्यामुळे सरळ झोपायलाच गेलो. सकाळी त्याचे वडील लवकरच कामाला लागले होते. त्याच्या आईने ब्रेकफास्टची तयारी केली होती. तीनच गोष्टी पण भरपूर. कॉफीसाठी मोठे बाउलच होते कारण ब्रेड, टोस्ट बुडवायला सोपे पडते. भरपूर न्याहारी करुन आम्ही टॉवेल घेऊन बीचवर पोचलो. पाणी अतिशय शांत व स्वच्छ होते. उन्हाळा असल्याने १५-२० डिग्री बाहेरचे तापमान होते. पण पाणी थोडे गरमच होते. सुमारे ५० फुट पर्यत समुद्र अजिबात खोल नव्हता, साधारण ४ ते ६ फुटच खोल होता त्यामुळे बिनधास्त डुंबु शकत होतो. एकंदर दोन दिवस खूपच मजेत गेले. रविवारी रात्री घरी पोचलो सोमवारी त्याची बायको परत येणार होती म्हणून तो खुष होता. त्याला माझ्या दीपाच्याच वयाचा मुलगा होता व बायकोचे परत दिवस भरत आले होते.

पुढच्याच शुक्रवारी त्याच्याकडे जेवायला जायचे ठरले. त्याच्या बायकोने मलाच कामाला लावले म्हणाली तु काहीपण इंडियन डिश करुन मला खायला घाल. मग मी कांदा बटाट्याचा रस्सा व पोळयांऐवजी पुऱ्या केल्या. मंडळी जेवणावर खुष झाली. रात्री फुमाऊ ने मला जवळच्या स्टेशनात सोडले व मी

घरी पोचलो. मधे दोनच स्टेशने होती. मधले स्टेशन फॅक्टरीच व माझे पुढचेच RUEIL MELMEZO रात्री दमल्यामुळे लगेचच झोपलो. ड्रॉइंगच्या चेकिंगचे बरेच काम घरी आणले होते. शनी, रविवारी तेच करत बसलो, शनिवार दुपारी थोडी फार ग्रोसरी करुन आलो. युरोपमध्ये सर्व शनिवार संध्याकाळपासून सोमवार सकाळपयर्यंत बंद असते त्यामुळे आठवणीने शनिवारी खास करुन खायच्या प्यायच्या गोष्टी आणाव्या लागतात.

सोमवार सकाळ फॅक्टरीला जायला निघालो, कोट चढवला. सवयीप्रमाणे खिसे चाचपून पाहिले आणि चमकलोच. माझ्या खिशात माझा पासपोर्ट नव्हता. घरात सर्व शोधून आलो पण कुठेच मिळाला नाही. थंडी असूनही घाम फुटला होता. मला काही चैन पडेना, माझ्या पॅरीसमध्यल्या सर्व प्रॉब्लेम्सना एकच उपाय होता श्री फुमाऊ. मी लवकरच फॅक्टरीत पोहोचलो व त्याची वाट पहात दारातच थांबलो. त्याला दारातच पकडला. माझा प्रॉब्लेम सांगीतला, तो संपूर्ण शांत, त्याच्या स्वभावाप्रमाणेच होता. मला वर घेऊन गेला. दोधांनी मिळून कॉफी प्यायली. कॉफी पिता पिता त्यांनी विचारले शेवटी केव्हा तू पासपोटे पाहिला होतास? माझ्या आठवणीप्रमाणे मी त्याच्या घरुन शुक्रवारी निघालो तेव्हा होता. नंतर काही आठवत नाही. पण नंतर मी घराबाहेर पडलोच नव्हतो. त्यानी बायकोला फोन करुन त्याच्या घरात नाही ना पहायला सांगीतले पण तिथेही नव्हता. इतकं करुनसुध्दा तो शांतच होता. मग त्याने गाडी काढली व मला जिथे शुक्रवारी सोडले होते तिथे गाडी पार्क करुन जवळच्या पोलीस स्टेशनवर गेलो. तिथे बाहेर रिसेप्शनसारखे टेबल ठेवले होते व एक सिव्हील ड्रेसमधला माणूस बसला होता. आम्हाला पाहताच तो उठला. मला विचारले, ‘‘इंडियन?‘‘ मी हो म्हंटल्यावर समोरचा खण उघडून माझा पासपोर्ट माझ्या हातात देत म्हणाला Be careful next time. बाकी काही देवाण घेवाण नाही कि रागावणे वा उपदेश नाही. मला तो देवदुतासारखा वाटला. मी विचारले कोणी आणून दिला तो म्हणाला मला माहीत नाही. तेव्हा मी इथे नव्हतो. पण जो कोणी होता त्यानी त्याची फर्ज बजावली त्यात काही मोठे नाही. इथे जवळपास काहीपण मिळाले तर लोक इथेच आणून देतात. त्यात काही मोठे नाही Enjoy Paris येवढे म्हणून तो त्याच्या कामाला लागला.

इथे मला ठाण्याची आठवण झाली. हेच ठाणे असते तर पासपोर्ट मिळाला नसता. जर कोणाला मिळाला असता तर त्यानी माझ्याकडे पैशाची मागणी केली असती. जर त्याने पोलीस स्टेशनवर दिला असता तर पोलीसने चांगलाच रुबाब दाखवला असता. तुम्ही शिकलेली माणसं, एव्हढी इंपॉर्टंट गोष्ट सांभाळता येत नाही. आता मला मोठया साहेबांना विचारावे लागेल की याचे काय करायचे? वगैरे वगैरे, पण सुटलो बाबा.

दिवस चालले होते त्याच्याच पुढच्या शनिवारी परत एअर इंडियाच्या ऑफिसला गेलो, पेपर चाळत असताना तिथल्या मॅडमनी बोलावले म्हणाल्या तुमच्या सौ. चे वय काय? मी चमकलोच, हिला वीणाच्या वयाशी काय करायचे आहे? तरीही तीने आग्रह केला म्हणून मी सांगितले. गेल्या २० जूनला २३ पुर्ण झाले. ती लगेच आनंदाने म्हणाली मग त्यांच्यासाठी गुड न्युज आहे. फ्रेंच गव्हर्नमेंटचे हे युथ इयर आहे आणि आम्ही त्यासाठी एक योजना राबवत आहोत. अतिशय कमी दरात ३२०० फ्रॅंक म्हणजे ६४००/- रुपयात त्यांचे रिटर्न तिकिट मी देईन. एअर इंडिया तुम्हाला सर्व मदत करेल पण तिकिट इथून घ्यायचे. मी तिकिट होल्ड करीन तुम्ही कामाला लागा. प्रथम मी खुष झालो पण लगेचच मला सर्व प्रश्न डोळयासमोर आले. वीणाचा पासपोर्ट पण नाही सर्व गोष्टीसाठी मुंबईस जावे लागेल. दीपा १ वर्षाची, तीला आईवर सोपवून वीणा येईल कशी?

संध्याकाळी श्री फुमाऊच्या घरी जाऊन वीणाला फोन केला ती म्हणाली, उगाच चेष्टा करु नका, कसे शक्य आहे. माझा पासपोर्टपण नाही. तरी मी तिला आईशी बोलायला सागितले. त्यानंतरची स्टोरी वीणाच्या शब्दातच .......

***क्रमशः***

*(...पान १८ वरून)*

## शिक्षक दिवस

कुठलीच कारवाई किंवा दंडही नाही. Happy Teacher's Day to you. कळावे, आपला विद्यार्थी, सदा पाटील. गुरुजीनी चिठ्ठी वाचली खिशातून पेन काढून त्यावर काही तरी लिहिले आणि भरलेल्या डोळ्यांनी साहेबांना आशिर्वाद देऊन निघून गेले... साहेबांनी चिठ्ठी उघडली आणि वाचली. त्यात लिहिलं होतं... सद्या गाढवा...एवढा मोठा साहेब झालास... पण किती रे शुद्धलेखनात चुका आणि टिचरच स्पेलिंग काय लिहिलस ticher's असं नसतं रे teacher's असं असतं ते... दहा वेळा लिहून काढ पाहू ते बरोबर स्पेलिंग... उद्या सकाळी शाळेत जाताना येईन तपासायला...

साहेबांनी आजूबाजूला पाहिलं, बाकी कोणी चिठ्ठी न पाहिल्याची, वाचल्याची खात्री केली. चिठ्ठीची घडी केली आणि ती चिठ्ठी निमूटपणे आपल्या खिशात घातली आणि लागले आपल्या कामाला... तर असे असतात कर्मठ गुरुजी, सुंभ जळाला तरी पिळ जळत नाही. स्वभावात बदल असंभव...!

♦

# ‘हितगुज’ला जाहिराती द्याव्यात

**अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृत महोत्सव, सहस्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन ‘हितगुज’ला आर्थिक सहकार्य करावे.**

**पाव पान रु.600/-, अर्धे पान रु.1200/-, पूर्ण पान रु.2500/- रक्कम ‘मराठे प्रतिष्ठान’ नावाने संपादिकेच्या पत्त्यावर चेकने पाठवावी. किंवा IDBI बँक दादर (पश्चिम) शाखेतील बचत क्र. 0501104000043519 मध्ये रोख किंवा चेकने भरा. वरील खाते क्र. 16 आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहावा. अशा रीतीने पैसे भरल्यावर आपले नाव पत्ता, पैसे भरल्याचा दिनांक व कारण, भ्रमणध्वनी, रक्कम आदी माहिती info@marathepratishthan.org या ई-मेलवर कळवावी. म्हणजे पावती पाठविता येऊ शकेल.**

**आपल्या परिवारात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी आहेत त्यांनी लिहीते होऊन आपले लिखाण आमच्या ईमेल वर पाठवून द्यावे. लिखाण एकावेळी दोन पानांच्या पेक्षा जास्त नसावे.**
**आपल्या ओळखीच्या प्रत्येक कुलबांधवांना आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला हितगुज वाचण्यासाठी उद्युक्त करा.**
**ज्या कुलबांधवांना आपल्या व्यवसायाची जाहीरात द्यायची आहे त्यांनी अवश्य द्यावी.**

**BOOK POST**

**If undelivered, Please return to**

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**

त्रैमासिक ‘हितगुज’ हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**